# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन अपद्वारे)

**सभा क्रं. - २२** **दि.२३/०९/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २३/०९/२०२० बुधवार रोजी सकाळी ११.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| नेरकर सरिता अनंत | सोनवणे सुरेश माणिक | खडके सुनिल वामनराव |
| पोकळे दिलीप बबनराव | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| खान रुकसानाबी गबलु | शेख हसीनाबी शरिफ | भंगाळे विष्णु रामदास |
| सोनवणे कांचन विकास | पाटील कुलभुषण विरभान | लढढा नितीन बालमुकुंद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | भिल पार्वताबाई दामु | बरडे नितीन मनोहर |
| शिंदे गायत्री उत्तम | कोल्हे ललित विजय | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| कोळी दत्तात्रय देवराम | बेंडाळे उज्वला मोहन | महाजन सुनिल सुपडू |
| सपकाळे रंजना भरत | राणे गायत्री इंद्रजित | महाजन जयश्री सुनिल |
| कोल्हे प्रविण रामदास | तायडे सुरेखा नितीन | नाईक प्रशांत सुरेश |
| सनकत चेतन गणेश | चव्हाण ज्योती बाळासाहेब | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे मुकुंदा भागवत | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे निता मंगलसिंग |
| काळे अमित पांडुरंग | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| चौधरी मंगला संजय | पाटील रेखा चुडामण | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे सुरेखा सुदाम | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे धिरज मुरलीधर | ढेकळे सदाशिव गणपत | शेख सैईदा युसुफ |
| काळे दिपमाला मनोज | पाटील राजेंद्र झिपरु | **स्विकृत सदस्य** |
| पाटील सचिन भिमराव | बालाणी भगतराम रावलमल | सोनवणे कैलास नारायण |
| भोईटे लताबाई रणजीत | अत्तरदे रजनी प्रकाश | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | काळे रेश्मा कुंदन | मराठे राजेंद्र नारायण |
| कापसे मयुर चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास | चौधरी महेश रतन |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील मिनाक्षी गोकुळ | जैन भागचंद मोतीलाल |
| पाटील विजय पुंडलिक | सोनार रंजना विजय | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी,उपायुक्त श्री.किरण देशमुख, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे, सहा.आयुक्त श्री.पवन पाटील व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्य श्री. सोनवणे अश्विन शांताराम यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३०० पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सोनवणे भारती कैलास, मा.महापौर | सन्मा.सदस्या, चेतना किशोर चौधरी यांचे सासुबाई व सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक, किशोर भावलाल चौधरी यांच्या मातोश्री स्व.पद्माबाई भावलाल चौधरी तसेच मनपा कर्मचारी किरण तळेले यांचे वडील स्व.यादव माधव तळेले यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | चौधरी महेश रतन | सन्मा.सदस्या, चेतना किशोर चौधरी यांचे सासुबाई व सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक,किशोर भावलाल चौधरी यांच्या मातोश्री स्व.पद्माबाई भावलाल चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३०१ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | महाजन सुनिल सुपडू | मा.पालकमंत्री श्री.गुलाबराव पाटील यांनी जळगांव शहर महानगरपालिकेतील शिवसेना नगरसेवकांचे वार्डातील विकास कामे करणे कामी २५ कोटी निधी मंजूर करुन दिलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दि.१२/०८/२०२० रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झालेल्या अंदाजपत्रकीय विशेष महासभेचे तसेच दि.१२/०८/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर ताई मला बोलायच आहे, एक अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, विरोधीपक्ष नेते ठराव मांडत आहे. ताई येतो आहे का आवाज ? सुनिलभाऊ महाजन बोलत आहे. .

**श्री.सुनिल महाजन :-** महापौरताई

**मा.महापौर :-** सुनिल भाऊ तुम्ही बोलु नका.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौरताई मी केव्हाचा बोलण्याची परवानगी मागत आहे, मला एक ठराव मांडायचा आहे अभिनंदनाचा.

**मा.महापौर :-** बोला, आवाज येत नाही सुनिल भाऊ महाजन.

**श्री.सुनिल महाजन :-** जळगांव जिल्ह्याचे मा.श्री.गुलाबरावजी पाटील, पालकमंत्री यांनी जळगांव शहराच्या विकास कामांसाठी १५ कोटीचा विशेष निधी जाहिर केला असुन त्या संदर्भातली तरतुद करण्याच्या संदर्भात आयुक्तांना आदेश दिलेले आहे. सत्ताधारी गटातर्फे वारंवार होणारे अन्याय झाल्यामुळे शिवसेनेच्या नगरसेवकांना निधी मिळत नव्हता म्हणुन पालकमंत्री महोदय यांनी शिवसेनेच्या १५ नगरसेवकांना १ कोटी रुपये निधी दिलेला आहे.

**श्री.**विष्णु भंगाळे :- आम्ही शिवसेनेतर्फे मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील यांचे अभिनंदन करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बोला, बोला.

**श्री.जितेंद्र मराठे :-** १०० कोटीची यादी बघा सुनिल भाऊ १०० कोटीची यादी बघा.

**श्री.सुनिल महाजन :-** तुम्ही चेक करा, १०० कोटीची यादी तुम्ही चेक करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्याला अर्थ नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेबा मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बोला बोला,

**श्री.सुनिल महाजन :-** तरी मी त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आमच्या बैठकीमध्ये कुठल्याही पक्षाचा भेदभाव न करता १०० कोटी मधुन आपण ४० ते ४२ कोटीचे कामे घेतलेले आहे त्याच्यात त्यांचे ही कामे घेतलेले आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** या पुर्वीचा जो विषय आहे २५ कोटी निधीचा असेल, १० कोटीचा किंवा ५ कोटीचा असेल त्यामध्ये सुध्दा आम्हाला समाविष्ट करुन घेतलेले नाही.

**मा.महापौर :-** आवाज येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, मागील काळामध्ये जे काही कामे आपल्या माध्यमातुन टाकले होते. १०० कोटी असेल २५ कोटी असेल, ५ कोटी असेल, याच्या मध्ये आमच्या शिवसेनेच्या नगरसेवकांना डावलण्यात आलेले आहे म्हणुन आमची एक विनंती की, आम्ही पालकमंत्री महोदय यांना केली होती. आणि त्यांनी मान्य करुन तो निधी १५ कोटीचा महापालिकेच्या माध्यमातुन शिवसेनेच्या नगरसेवकाच्या प्रभागात सुध्दा विकास झाला पाहिजे. यादृष्टीने त्यांनी तो निधी दिलेला आहे, आणि प्रत्येक नगरसेवकाला १ कोटी अश्या प्रकारे नियोजन मा.आयुक्त साहेब यांनी करावे असे आदेश पालकमंत्री यांनी दिलेले आहे. म्हणुन सुनिल भाऊंनी जो प्रस्ताव मांडला त्याला मी अनुमोदन देतो. अप्पासाहेब आम्ही आपले ही अभिनंदन करु की, तुम्ही आपल्या प्रभागतली कामे टाकली.

**श्री.भगतराम बालाणी :-** विष्णु भाऊ, सुनिल भाऊ तुम्हाला मी सांगु ईच्छितो की, जेव्हा २५ कोटीचे प्रस्ताव तयार करण्यात आलेले होते. तेव्हा महापौर शिवसेनेचे मा.श्री. नितीन भाऊ लढढा होते.

**श्री.सुनिल महाजन :-** दोन वर्षापासुन एक ही रुपया दिलेला नाही, दोन वर्षात एक ही रुपया दिलेला नाही कामे झालेले नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** दोन वर्षात एक रुपया दिलेला नाही कामे झालेले नाही. महापौर महोदया, आम्ही अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आणि अनुमोदन दिलेले आहे.

**मा.महापौर :-** पुढचे विषय घ्या.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई प्रश्न उत्तराचा तास घेतलेला नाही. प्रश्न उत्तराचा तास का डावलण्यात आला.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ पुढच्या वेळेस घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ताई मी जे प्रश्न उपस्थित केलेले होते ते खुप महत्वाचे होते.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ पुढच्या मिटींगला घेऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय क्र.१ प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ, विषयपत्रिकेवरचे विषय घ्या.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**श्री.सुनिल महाजन :-** राजु भाऊ इतकी काय घाई आहे तुम्हाला, कुठे जायचे आहे तुम्हाला, शांतता ठेवा, पुढचे सभापती आहे तुम्ही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** पुढचे सभापती बनणार ना तुम्ही, की आमच्या ललित भाऊला करता सभापती,

**श्री.राजेंद्र पाटील :-** अजेंडयावरचे विषय होऊन जाऊ द्या भाऊ, नंतर बोला.

**मा.महापौर :-** माईक बंद करा सर्वांनी आपले.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई प्रश्नउत्तराचा तास घेतला नाही. माझे प्रश्न उपस्थित केलेले होते. प्रश्न उत्तरांचा तास का डावलण्यात आला.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ, पुढच्या वेळेस घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ताई, प्रश्नांची उत्तरे मिळालेली होती, आणि प्रश्न ही महत्वाचे होते.

**मा.महापौर :-** पुढच्या सभेत घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे ताई.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ तुम्ही आराम करा.

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे अप्पा साहेब.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.१२/०८/२०२० रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झालेल्या अंदाजपत्रकीय विशेष महासभेचे तसेच दि.१२/०८/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त मंजूर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०  प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** जळगांव शहर महानगरपालिकेचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षण अहवालाची माहिती घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** लेखा परिक्षण अहवालाची माहिती घेतली. प्रशासनाला येथे सुचना आहे की, लेखा परिक्षणात जे १३६ आक्षेप नोंदविलेले आहे आणि ४ महिन्याच्या आत अनुपालन अहवाल पाठविण्याचे निर्देश दिलेले आहे. तर प्रशासनाने ४ महिन्याच्या आत अनुपालन अहवाल पाठविण्याची दक्षता घ्यायची आहे. लेखा परिक्षण अहवालाची माहिती घेतली.

**श्री.नितीन लढढा :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** महापौर महोदया, लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना वितरीत करण्यात आलेले आहे का ?

**मा.महापौर :-** हो वितरीत केलेले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही, आम्हाला पण मिळालेल्या नाही.

**श्री.नितीन लढढा :- कारण कसे आहे लेखा परिक्षणाचा अहवाल हा महत्वाचा अहवाल असतो.** सर्व सदस्यांना अहवाल मिळणे आवश्यक असतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ प्रशासन उत्तर देत आहे. त्यांना उत्तर देऊ द्या.

**मा.उपायुक्त श्री.संतोष वाहुळे:-** लेखा परिक्षण अहवाल सन २०१५-१६ याचा जो आपला अहवाल प्राप्त झालेला आहे. तो सन्मा.गटनेते यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. यथावकाश तो सर्व सदस्यांनाही उपलब्ध करुन देण्यात येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महासभा संपल्यानंतर आम्हाला त्याच्यातले काय कळेल, या सभेला जर माहिती मिळाली असती तर त्याच्या काही आम्हाला चर्चा करता आली असती किंवा समजुन घेता आल असते.

**मा.महापौर :-** गटनेत्यांना दिलेले आहे अहवाल.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** हा बोला नितीन भाऊ.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताई आम्हाला ही मिळालेले नाही.

**श्री.रियाज अहमद बागवान :-** मुझे भी नही मिला है.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभागृहात खोटे बोलत आहे महापौर, भारतीय जनता पार्टीचे गटनेते स्वता: सांगत आहे की, मिळालेले नाही. सभागृहाची दिशाभुल होत आहे.

**मा.उपायुक्त श्री.संतोष वाहुळे:-** सन्मा.सभागृह यापुर्वी जे अहवाल सादर करण्यात आलेले होते ते लेखा परिक्षणाचे, तर हीच पध्दत अवलंबण्यात आलेली होती. गटनेत्यांना आपण अहवालाची माहिती उपलब्ध करुन देतो.आणि तो प्रस्ताव आपण सभागृहापुढे सादर करतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सत्ताधारी गटनेत्यांना सुध्दा मिळालेला नाही.

**श्री.चेतन सनकत :-** सदस्यांना अहवाल मिळालेला नाही.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई, येथे लेखा परिक्षण अहवालाच्या प्रतीच मी अवलोकन केलेले आहे, त्याच्या मध्ये आक्षेप क्र.११ हा संपुर्ण आपल्या मालमत्ते बाबतचा एक मोठा आक्षेप होता की, मालमत्ता विभागाकडील म.न.पा. गाळयांचे नुतनीकरण करण्यात आलेले नसल्याने झालेली अनियमिततेबाबत, सन २०१५-१६ हा लेखा परिक्षणाचा अहवाल आहे. आणि याच्या मध्ये त्यांनी जे आक्षेप नोंदविलेले आहे. ते आक्षेप या पध्दतीचे आहे की, मा.सर्वोच्च न्यायालयाने म.न.पा.च्या बाजुने निर्णय देऊन महानगरपालिका प्रशासनाने मुदत संपलेले अद्याप संबंधीत गाळेधारकांकडुन गाळे म.न.पा.च्या ताब्यात घेतलेले नाही. तसेच गाळे धारकांकडुन रेडीरेकनरनुसार भाडे वसुल करण्यात आलेले नाही. तरी मुदत संपलेले गाळे म.न.पा.च्या ताब्यात घेऊन त्यांच्या द्वारे भाडे करार करण्यात आलेला नसल्याने म.न.पा.चे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे व होत आहे. गाळा भाडेचे वसुलीचे प्रमाण हे ०.७८ टक्के हे अत्यंत कमी असुन थकबाकी दिवसेंदिवस वाढत आहे. आणि शेवटी त्यांनी वसुल पात्र रक्कम रु.१६८,६५,५५,४५४/- असा आक्षेप नोंदविलेला आहे. याच्यानंतरही भाडयामध्ये वाढ झालेली आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने हा लेखा परिक्षणाचा अहवाल भविष्यात सर्व सभागृह सदस्यांना त्रासदायक ठरु शकतो. तर या संदर्भात नेमकी प्रशासनाची भुमिका काय ते अध्यापपावेतो, हा अहवाल महानगरपालिकेला कोणत्या तारखेस प्राप्त झालेला आहे. आणि चार महिन्यामध्ये त्यांच अनुपालन करणे अपेक्षित होत. नेमक अहवाल प्राप्त झाल्यानंतर किती महिन्याचा कालावधी गेलेला आहे. याच्या संदर्भातली स्पष्ट भुमिका ही प्रशासनाने सभागृहासमोर ठेवली तर सभागृहातील सदस्यांच समाधान ही होईल आणि याच्या बाबतीत आपण भविष्यात काय निर्णय घेणे संदर्भात काय अडचणी येऊ शकता किंवा काय त्या व्यापाऱ्यांना कसा न्याय दिला जाऊ शकतो. याच्या संदर्भातली भुमिका व परिस्थिती योग्य पध्दतीने आपल्या समोर आकलन करता येईल. प्रशासनाला हा प्रस्ताव केव्हा प्राप्त झालेला आहे. आणि याच अनुपालन अहवाल गेला आहे किंवा नाही या संदर्भातील विस्तृत माहिती सभागृहासमोर ठेवावी.

**मा.उपायुक्त श्री.संतोष वाहुळे:-** सन्मा.सभागृह, सहाय्यक संचालक, लेखा परिक्षण विभाग, औरंगाबाद यांनी दि.२ जानेवारी २०१९ ते २३ जुलै २०१९ या दरम्यान महानगरपालिका, जळगांव याचे लेखा परिक्षण केलेले होते आणि लेखा परिक्षणाचा अहवाल हा मार्च २०२० या दिवशी तो सादर करण्यात आलेला होता. परंतु कोविड आणि इतर याच्या पार्श्वभुमीवर आपल्या महासभेला विलंब झाल्यामुळे सभागृहापुढे सादर करता आलेला नाही. महानगरपालिकेच्या अधिनियम १०७ (अ) अन्वये तीन महिन्यामध्ये अहवाल सादर करणे गरजेचे आहे. परंतु महासभा झालेली नसल्याने हा अहवाल विलंबामुळे सादर करण्यात आलेला आहे.

**श्री.भागचंद जैन :-** बरोबर आहे साहेब पण तुम्ही सांगतात की, गटनेत्यांना मिळाला सत्ताधारी गटनेत्यांना सुध्दा अहवाल मिळाला नाही. साहेब, वाहुळे साहेब, तुम्ही आता सांगितले, बोला नितीन भाऊ बोला,

**श्री.नितीन लढढा :-** वाहुळे साहेब, माझ म्हणणे ऐवढे आहे की, याच्यातले जवळपास ६५ आक्षेप जे आहे. सभागृहासमोर समजा आपण आज सादर केलेले आहे. त्याला विलंब झालेला आहे कोविडच्या कारणामुळे, अहवाल तीन महिन्याच्या आत सादर करणे अपेक्षित होते. परंतु साधारणता ६ महिन्याचा कालावधी झाला, परंतु या १६५ अनुपालन अहवालापैकी सर्वात महत्वाचा अनुपालन अहवाल हा फुले मार्केटच्या अनुषंगाने दिसुन येत आहे. बाकी काही किरकोळ प्रमाणातील असतील तर तो भाग वेगळा आहे. परंतु याच्या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे. असे विशेष लेखा परिक्षणामध्ये संबोधीत करण्यात आलेले आहे. तर या अनुषंगाने या अनुपालन अहवालाच्या बाबतीत आपण आता पर्यंत या आक्षेपाचे अनुपालन करण्यात आलेले आहे की नाही किंवा कसे या संदर्भात उघड होत नाही. तरी प्रशासनाने ही भुमिका स्पष्ट करावी की, आपण याचे अनुपालन कश्या पध्दतीने करणार आहोत आणि ते केले गेले की नाही.

**मा.उपायुक्त श्री.संतोष वाहुळे:-** सन्मा.सभागृह, जो लेखा परिक्षण अहवाल आपल्याला प्राप्त झालेला आहे ते आपण पहिले महासभेपुढे सादर करतो. महासभेने मान्यता दिल्यानंतर तो आपण सर्व विभाग प्रमुखांना त्यांच्या अहवालातील त्रृट्या निशी आपण तो पाठवतो. आणि त्याच्यानंतर त्याच अनुपालन सादर करुन एकत्रीत रित्या आपण औरंगाबाद लेखा परिक्षकांना पाठवुन देतो. ही सर्व कार्यपध्दती आहे याच्यावरची.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई बघा हा अत्यंत महत्वाचा विषय आहे कारण आपण शेवटी पुढच्या सभेमध्ये किंवा महिन्या दोन महिन्यानंतर गाळेधारकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातुन प्रस्ताव करुन देण्याच्या तयारी मध्ये असाल. परंतु लेखा

परिक्षणाची गंभिर त्रुटी जी आहे. या गंभिर त्रुटीचे अनुपालन होत नाही. तो पर्यंत तो प्रस्ताव मांडता येईल किंवा कसे याच्या संदर्भात ही उघड होणे गरजेचे आहे. अन्यथा काय आहे. सदस्य ही संभ्रमात असतात व्यापारी ही संभ्रमात असतात. तर प्रशासनाची याच्या बाबतीत भुमिका काय ? याच्या मध्ये काय होईल की, एकीकडे आपण वृत्तपत्रातुन पाहतो, गाळेधारकांचा विषय या मिटींग मध्ये येणार पुढच्या मिटींगमध्ये येणार. कारण त्यांना न्याय देत असतांना कुठेतरी लेखा परिक्षणाच्या अहवालात नोंदविलेले आक्षेप व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निवाडे, यात कुठेतरी अर्थाअर्थी एक दुसऱ्यां मध्ये गुत्ता होऊ नये किंवा याबाबत कायदेशीर रित्या स्पष्ट भुमिका आहे. आपण बऱ्याच वेळा लेखा परिक्षण अहवालाच्या भितीने म्हणा किंवा भितीच्या अनुषंगाने म्हणा आपण बऱ्याच गोष्टीं आपण टाळत असतो. नेमक या संदर्भात सदस्यांच्या मनात संभ्रम निर्माण होत असतो. प्रशासनाने याच दृष्टीकोणाने स्पष्टीकरण दिल तर बर होईल.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह आताचा जो विषय महासभेसमोर आहे. तो आर्थिक वर्ष २०१५-१६ या वर्षामध्ये राज्य शासनाच्या स्थानिक लेखा परिक्षण विभागाकडुन करण्यात आलेल्या लेखा परिक्षणाचा अहवाल हा मा.महासभेसमोर माहितीसाठी ठेवलेला आहे. हा जो लेखा परिक्षण अहवालाची आपणास सर्व सन्मा.सदस्यांना कल्पना आहे. याच्यामध्ये मुंबई स्थानिक लेखा परिक्षण अधिनियम १९३० या तरतुदीप्रमाणे राज्य शासनाचे लेखा परिक्षण विभागामार्फत लेखा परिक्षण होते. हा लेखा परिक्षण अहवाल झाल्यानंतर मा.महासभे समोर तो ठेवला जातो. त्यानंतर आपण त्याचा अनुपालन अहवाल जो आहे, सन्मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला अहवाल प्राप्त झाल्यापासुन चार महिन्याच्या आत आपण आपले म्हणणे लेखा परिक्षण विभागाला सादर करणे आवश्यक आहे. आता कोरोनाच्या पार्श्वभुमीवर आपल्या महासभेपुढे ठेवण्यामध्ये झालेला वेळ विचारात घेता आता आजच्या महासभेच्या या लेखा परिक्षणाच्या अवलोकनानंतर आपल्याला त्याच्यामध्ये जे काही १८५-१८६ आक्षेप आहे. या सर्वांच्या बाबतीमध्ये महानगरपालिका म्हणुन आपल जे काही म्हणण आहे, ते आपण लेखा परिक्षण विभागाला देणार आहोत. लेखा परिक्षण विभाग आपले म्हणणे आणि त्या वेळेची जे काही परिस्थिती होती त्याचा विचार करुन त्याच्या वरती प्रथम पुढील शेरे ते देतात, सदर रिमार्क हे जर त्यांना मान्य असतील तर तो लेखा परिक्षणाचा जो आक्षेप आहे तो वगळला जातो. जर मान्य नसेल तर आपल्याला खुलासा करण्याची संधी मिळते. आणि अंतिम रित्या त्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे लेखा परिक्षणाचा आक्षेप आणि त्याच्यावर स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेला खुलासा हे दोन्ही एकत्रीत पणे त्या संबंधीत विभागीय आयुक्त यांचेकडे पाठविले जातात. आणि अंतिम रित्या त्या ठिकाणी या लेखा परिक्षणाचा निर्णय होतो. आता सन्मा.सदस्यांनी जो एका विशेष आक्षेपाबाबत मुद्दा मांडला. त्याच्या बाबतीमध्ये सन २०१५-१६ मध्ये आपल्याला त्याची पार्श्वभुमी माहित आहे. दुकानांसंदर्भात २१ मार्च २०१२ ला मुदत संपल्यानंतर याची मुदत वाढविणे असेल किंवा गाळे ताब्यात घेणे असतील.याच्या बाबतीमध्ये महानगरपालिकेने वेळोवेळी काही निर्णय घेतलेले आहे. त्याच्या बाबतीत काही नागरीकांनी काही व्यापाऱ्यांनी या बाबतीमध्ये राज्य शासन असेल किंवा न्यायालय असतील. त्यामध्ये काही आक्षेप नोंदवुन त्याच्यामध्ये अपिल केली. त्याच्यावर जे काही निर्णय होण्यामध्ये जो काही कालावधी गेलेला आहे. त्या पिरयेड मध्ये ना त्यांची मुदतवाढ आपल्याला करता आली ना ही गाळे ताब्यात घेण्यात आले. आता याच्या मध्ये लेखा परिक्षण अहवाला मध्ये जो काही उल्लेख आहे की, सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानंतर, तो सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानंतर जी गाळे ताब्यात घेण्याची प्रक्रिया आपली चालु होती. त्यातली काही गाळे आपण ताब्यात घेतले. आणि नंतरच्या काळामध्ये पुढची प्रक्रिया काही राज्य शासनाकडे दाखल झालेल्या काही अर्जांमुळे ही प्रक्रिया काही काळासाठी स्थगित ठेवण्यात आली होती. आता त्याच्यानंतर २०१९ मध्ये आपल्या महानगरपालिकेच्या अधिनियमात जी कलम ७९ आहे. त्याच्यात राज्य शासनाने सुधारणा केलेली आहे. त्या सुधारणे प्रमाणे ज्या दुकानांचे पहिले वाटप जाहिर लिलाव पध्दतीने वैध रित्या झाला असेल अश्यांच्या बाबतीमध्ये महानगरपालिका त्यांची जास्तीत जास्त १० वर्षासाठी मुदतवाढ करु शकते.अशी तरतुद केलेली आहे. ही कायद्यात दुरुस्ती २०१८ मध्ये आलेली आहे. आणि याची जी मुदतवाढ द्यायची आहे याचे सविस्तर नियम हे मागच्या सप्टेंबर २०१९ मध्ये आलेले आहे. अर्थातच या तरतुदीचा विचार करून आपल्याला जे काही मुदतीचे सन २०१२ पर्यंतचे संपलेले गाळे आहे. साधारणता २६००-२७०० गाळे आहे. याच्या संदर्भात महानगरपालिकातर्फे आपल्याला धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक असलेला प्रस्ताव आम्ही प्रशासनामार्फत सादर करत आहोत. आणि याच्यावरती महानगरपालिकेच मुदतवाढ किंवा ज्यांना लिलाव पध्दतीने दिले त्यांच्या बाबतीत पुढील धोरण निश्चित केल्यानंतर आपल्याला त्याप्रमाणे महानगरपालिकेची दिशा निश्चित करुन आपल्याला लेखा परिक्षणाच्या अहवालाचा अंतीम उत्तर देणे शक्य आहे. परंतु याच्या मध्ये जे काही महानगरपालिकेच आर्थिक नुकसान झाल्याचे उल्लेख आहे. आपल्याला २०१२ मध्ये मुदत संपलेल्या गाळयांच्या बाबती मध्ये मा.जिल्हा न्यायालयाने जो काही आपल्याला दिलेले निर्णय आहे किंवा आदेश आहे. त्याप्रमाणे मुदत संपल्यापासुन आता पर्यंतच्या पिरेड मध्ये एकतर मुदतवाढ देईपर्यंत किंवा गाळा ताब्यात घेईपर्यंतच्या कालावधीसाठी नुकसान

भरपाईची मागणी महानगरपालिका करु शकते. त्याप्रमाणे नुकसान भरपाईची मागणी ही गाळे धारकांकडे करुन ती आपल्याला वसुल करावी लागणार आहे. त्यामुळे जरी लेखा परिक्षण आक्षेपामध्ये काही नुकसान झाल्याचा उल्लेख असला तरी ज्या वेळी ही वसुली पुर्ण होईल ते नुकसान आपल्याला भरुन काढता येईल. अर्थातच आपल्याला कुठल्याही प्रकारची भाडे असेल किंवा नुकसान भरपाई असेल ही आपण माफ केलेली नाही. हे महानगरपालिकेचे आर्थिक स्वरुपी नुकसान होऊ देणार नाही. झालेली नुकसान भरपाई आणि पुढच्या कालावधीतील नुकसान भरपाई व पुढचा होणारा नुकसान महानगरपालिकेला वसुल करावा लागणार आहे. त्यानंतर अंतिम कार्यवाही झाल्यानंतर आपण लेखा परिक्षणाला आपण सविस्तर कळविणार आहोत. आणि सन २०१२ ते २०१५-२०१६ या कालावधीसाठी लेखा परिक्षणा मध्ये ऐवढया रकमेची नुकसान झाल्याचे उल्लेख आहे ती रक्कम वसुल झाल्यानंतर त्यानंतर आपल्याला लेखापरिक्षणाला कळवुन त्याप्रमाणे त्या अंतिम रित्या मान्य करुन त्याची मान्यता घेणे शक्य होणार.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई, आता आयुक्त साहेबांनी सभागृहासमोर जी माहिती पुरवली, मा.आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो, साधारणता सुप्रिम कोर्टाचा निवाडा हा सन २०१५-१६ च्या दरम्यान मध्ये झालेला होता आणि तो निवाडा झाल्यानंतर कार्यवाही का केली गेली नाही. त्याच्यावर राज्य शासनाने २०१८ मध्ये निर्णय घेतला, परंतु कार्यवाही तात्पुरती झाली असती तर ते एक वेगळ चित्र राहिल असत. तो एक भाग वेगळा राहु द्या. या उपरांत आता साधारणता २-३ महिन्यामध्ये या गाळेधारकांपैकी काही गाळे धारकांचे काही सुट सुप्रिम कोर्टामध्ये प्रलंबीत होते. आणि ते प्रलंबीत असतांना राज्य शासनाने,

**मा.महापौर :-** आवाज येत नाही नितीन भाऊ .

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ तुमचा आवाज येत नाही.

**श्री.नितीन लढढा :-** येत आहे का माझा आवाज ?

**मा.महापौर :-** नितीन भाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** येतो आहे आता येत आहे तुमचा आवाज.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये २ ते ३ महिन्यापुर्वी काही गाळेधारकांचे जुने पिटीशन प्रलंबीत होते. आणि त्या प्रलंबीत पिटीशन मध्ये म्हणजे राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतरही त्या संदर्भातली सर्व माहिती ही सर्वोच्च न्यायालयासमोर आणली गेल्यानंतर ही त्या गाळेधारकांना कुठल्याही प्रकारचा दिलासा दिलेला नाही. यापुर्वी जो निवाडा सुप्रिम कोर्टानी दिलेला होता आणि तोच निवाडा ठेवला आणि ते रिट पिटीशन सुप्रिम कोर्टात डिसमिस केलेले आहे. म्हणजे याचा अर्थ असा आहे की, राज्य शासनाने दिलेला निर्णय हा मा.सर्वोच्च न्यायालयाला सुध्दा मान्य होता. असे त्याच्यावरुन अधोरेखित होत आहे. माझ्या म्हणण्याचे तात्पर्य हेच आहे की, व्यापाऱ्यांना न्याय मिळायला पाहिजे. व्यापाऱ्यांना न्याय देतांना कुठेतरी सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होईल किंवा सभागृहाकडुन तशी चुक घडेल आणि जर भविष्यात लेखा परिक्षणात जर असेच आक्षेप राहिले तर निश्चितपणे ते सर्व सन्मा.सदस्यांना त्रासदायक ठरेल, ही एक बाब मी आपल्या निदर्शनास या दृष्टीकोणातुन आणु ईच्छितो आहे की, राज्य शासनाचा निवाडा झाल्याचे दोन तीन महिन्यापुर्वी मा.सुप्रिम कोर्टाचा निवाडा झालेला आहे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, सन्मा.सदस्यांनी याची जी काही कायदेशीर पार्श्वभुमी निदर्शनाला आणुन दिलेली आहे. या सर्वांचा विचार करुन वेळोवेळेला वेगवेगळे स्तरावरील न्यायालयाने दिलेले आदेश, जिल्हा न्यायालय असेल, उच्च न्यायालय असेल, सर्वोच्च न्यायालय असेल, या संदर्भामध्ये दिलेले आदेश आता कायद्या मध्ये झालेली सन २००८ ची सुधारणा सन २०१९ मध्ये झालेले नियम हे संपुर्ण विचारात घेऊन कुठेही न्यायालयाचा अवमान होणार नाही याची पुर्ण खात्री करुनच याच्यावर महानगरपालिकेचे धोरण निश्चित करावे लागणार आहे. त्या प्रमाणे सर्व कायदेशीर बाबी विचारात घेऊनच पुढील प्रस्ताव महासभेसमोर सादर करण्यात येईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण श्री. रा.दे. माने, सहा.संचालक यांचे पथकाने दि.०२/०१/२०१९ ते दि.२३/०७/२०१९ पुर्ण करुन तसा अहवाल दि.१७/०३/२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

सदरच्या अहवाला मध्ये एकुण १३६ आक्षेप नोंदविणेत आलेले असून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियमाचे कलम १० (१) मधील तरतुदीनुसार सदरचा अहवाल प्राप्त झाले पासून ४ महिन्यांचे आत आयुक्त यांचे स्वाक्षरीने अनुपालन अहवाल पाठविणेबाबत कळविलेले आहे.

तत्पुर्वी, महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ नूसार अहवाल मिळाल्याच्या दिनांक पासून तीन महिन्यांच्या आत असा लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रशासनाकडुन आलेल्या जळगांव शहर महानगरपालिकेचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षण अहवालाची माहिती घेतली. तरी प्रशासनाने ४ महिन्याच्या आत लेखापरिक्षण अहवालाचे अनुपालन तयार करुन स्थानिक निधी लेखापरिक्षण कार्यालयाकडेस पाठविण्याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- अॅड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** सि.स.क्रं.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरिता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन न.पा.ठराव क्रं.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेबाबतच्या प्रशासनाच्या प्रस्तावावर महासभा ठराव क्रं.१८० दि.०३/०८/२०१९ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या प्राप्त झालेल्या अहवालावर विचार करुन निर्णय घेणे.

**सन्मा.सदस्या श्रीमती सुन्नाबी राजु देशमुख यांनी घेतलेले लेखी हरकत खालील प्रमाणे,**

जळगांव येथिल महानगरपालिका हद्दीत सि.स.क्र.२९ ब हल्लीचा भंगार बाजार बाबत न.पा.जळगांवचा दि :२५/१०/१९९७ ठराव क्र.३३७ नुसार ९९ वर्षा करीता भाडे तत्वाने देणेबाबत पारित केला होता. सदरहु ठराव बाबत दि.०३/०८/२०१९ रोजीचा ठराव क्र.१८० अन्वये गठीत समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी न.पा.ने ९९ वर्षाचा ठराव कायद्याला धरुन नाही म्हणुन तो रद्द करण्याबाबतीत सहमती दर्शविलेली आहे. त्याच अहवालात समितीचे सदस्यांनी सदरहु बाजाराच्या जागेचे भाडे अल्प असल्याचे नमुद केले आहे व त्यांनी भाडे ही थकित केलेले आहे. असे अहवालात नमुद करणे समितीचे कक्षाबाहेरचे विषय आहे.

सदरहु गठीत समितीत ४ सदस्य नियुक्त होते परंतु गैरहजर व १ ने राजीनामा दिला असल्याने दोनच सदस्यांचा अहवाल दिलेला आहे. त्या अनुषंगाने सदर अहवाल एकांगी व निष्प्रभ ठरतो.

जर भंगार बाजार ९९ वर्षाच्या कराराने दिलेला ठराव खंडीत करण्यासाठी फक्त दोन सदस्य अहवाल देत असतील तर सदर अहवाल पुर्वग्रहदुषीत आहे असेच समजले पाहीजे.

दरम्यान जळगांवच्या तत्कालीन नगरपालिकेने व आताच्या महानगरपालिकेने किती जागा ९९ वर्षाच्या कराराने दिल्या आहेत याची माहिती सभागृहाला अवगत करुन द्यावी त्यांच्याकडुन भाडे करार पोटी किती रक्कम येते याचाही खुलासा करावा अशी मागणी मी करत आहे.

सदरहु भंगार बाजाराची जागा आठवडे बाजारातील दुकानदारांना कै.भिकमचंद जैन मार्केटचा मोठया संकुलासाठी खाली करुन दिल्याने त्यांचे मोबदल्यात त्यांचे उदरनिर्वाहासाठी मोकळया जागेत जागा आखुन दिले होते व अल्प दराचे भाडे ठरवुन दिले आहे. आता त्या संकुलामुळे लाखो रुपयांचे उत्पन्न महानगरपालिकेला प्राप्त होत आहे म्हणुन खालील प्रमाणे आमची विनंती की, सदर भंगार बाजार आहे त्याच स्थितीत राहु द्यावा जुना ठराव विखंडीत करुन नये तसेच तेथिल व्यवसायीकांशी चर्चा करुन तोडगा काढुन भंगार बाजाराचे दुकानंदाराना महानगरपालिकेचे अधिनियमानुसार सदरहु जागा योग्य मुदतीसाठी व भाडे तत्त्वावर देणे बाबत ठराव पारित करण्यात यावा.

**सन्मा.सदस्य श्री.इब्राहिम मुसा पटेल यांनी घेतलेले लेखी हरकत खालील प्रमाणे,**

दि.२३/०९/२०२० रोजी आयोजीत महासभेत विषय क्र.३ अन्वये "सि.स.नं.२९ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन न.पा. ठराव क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ रोजी रद्द करणेबाबतच्या प्रशासनाच्या प्रस्तावावर महासभा ठराव क्र.१८० दि.०३/०८/२०१९ अन्वये गठीत करणेत आलेल्या समितीच्या अहवालावर विचार करुन निर्णय घेणे" संबंधात विषय विचाराधीन आहे. प्रस्तावासोबत नियुक्त करण्यात आलेल्या चार सदस्यीय समिती पैकी फक्त दोन सदस्यांच्या स्वाक्षरींचा कारणमिमांसा नसलेला अहवाल देण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमुद करणेत आले प्रमाणे हरकत वजा उपसुचना देण्यात येत आहे. त्याची कार्यवृत्त पुस्तकात व ठरावात नोंद घेण्यात यावी ही विनंती आहे.

१) तत्कालीन जळगांव नगरपालिकेने गतकाळात तत्कालीन आठवडे बाजाराच्या जागेवर व्यापारी संकुल उभे करण्याचा प्रकल्प हाती घेतला होता त्यावेळेस भंगार बाजार हा आठवडे बाजारापैकीच्या जागेवर होता ह्या कोटयावधी रुपये किंमतीच्या जागेवरुन भंगार बाजार हलविण्यासाठी तत्कालीन नगरपालिका प्रशासन व भंगार बाजारातील व्यावसायीक ह्यांच्यात बोलणी होवुन शहर विकासाच्या दृष्टीने भंगार बाजार व्यावसायिक यांनी नगरपालिकेने सुचविलेल्या जागेवर स्थलांतरणास मान्यता दिली. मात्र त्यासाठी दिर्घ मुदतीच्या कराराने जागा देणे संबंधात अट ठेवलेली होती. त्यामुळेच तत्कालीन न.पा. ठ.क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ रोजी सर्वानुमते पारित करण्यात आलेला असुन तो कायदेशीर व वैध स्वरुपाचा ठराव असुन सदर ठरावाची अंमलबजावणी होवुन आज जवळपास २० वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटलेला असुन सदर ठराव आता रद्द करणे नियमबाह्य व बेकायदेशीर आहे.

२) भंगार बाजार व्यावसायीक यांना स्थलांतरीत केलेनंतर सि.स.नं.२९ब या जागे संबंधात व्यावसायीक यांचे सोबत तत्कालीन नगरपालिकेने करारनामा केलेला आहे. त्यामुळे त्या करारानुसार त्यांना ९९ वर्षाचा भोगवटा करण्याचा अधिकार ठरावानुसार प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर ठराव रद्द करणे म्हणजे इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टच्या तरतुदीचा भंग करणे होईल व परिणामी महापालिकेस कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल.

३) सि.स.नं.२९ब ची जागा ही भंगार बाजार व्यवसायिक यांना महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम २७२ चे तरतुदीचे अनुषंगाने देण्यात आलेली असुन सदर कलमास नगरपालिका अधिनियमचे कलम ९२ ची बाधा येत नाही या संबंधात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने जी.बी. महाजन /विरुध्द/जळगांव नगरपालिका या याचिकेत नगरपालिकेच्या पक्षात निर्णय दिलेला असुन त्याचे अवलोकन होवुनच सदर प्रकरणी निर्णय घेणे योग्य होईल. (सदर याचिका महात्मा फुले मार्केट संबंधातील आहे.)

४) या संबंधात गठीत चार सदस्यीय समितीपैकी फक्त दोन सदस्यांची स्वाक्षरी असलेला अहवाल आहे. समिती दि.०३/०८/२०१९ रोजी गठित झालेनंतर एक वर्षानंतर समितीचा अहवाल आलेला आहे. समितीच्या किती बैठका झाल्यात तसेच समितीने कोणत्या कागदपत्रांची पडताळणी केली याबाबतची कोणतीच माहिती तसेच ठराव रद्द करणेबाबतची सुस्पष्ट व कायदेशीर कारण मिमांसा अहवालात नमुद नाही. तसेच समितीत कायद्याचे ज्ञान असलेले अभ्यासु सदस्यांचा सुध्दा समावेश दिसुन येत नाही.

प्रसंग परत्वे स्पष्ट करण्यात येत आहे की, तत्कालीन जळगांव नगरपालिकेने जळगांव शहरात उभारलेल्या सेंट्रल फुले मार्केट, गोलाणी मार्केट यांचे बांधकाम करतांना शहरातील काही नागरीकांनी त्यास विरोध केलेला होता व त्या संबंधात मे.न्यायालयात दावे दाखल केलेले होते. त्यापैकीच जी.बी.महाजन/वि/जळगांव नगरपालिका ही याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रदीर्घ सुनावणी अंती नामदार सर्वोच्च न्यायालयाने याचिकेवर सर्वांगी सर्वकाही विचार करुन याचिकेचा निर्णय देतांना स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे मार्केटची करारनामा लीज ही दिर्घ मुदतीची असणे गरजेचे असुन मे.सर्वोच्च न्यायालयाने कलम २७२ चे तरतुदीस अनुसरुन स्वत: ५० वर्षे मुदतीचा करारनामा करणे संबंधात नगरपालिकेस निर्देश दिलेले असुन नगरपालिका अधिनियमाचे कलम ९२ ची त्यास बाधा येत नाही असे स्पष्ट केलेले आहे.

वास्तविक पाहता फुले मार्केट, गोलाणी मार्केट व इतर व्यापारी संकुल यांना ही कलम २७२ चे तरतुदीनुसार करारनामे करणे योग्य ठरु शकतात असे मत आहे.

यास्तव विनंती करण्यात येत आहे की, सि.स.नं.२९ब च्या जागेवर असलेला भंगार बाजार तत्कालीन नगरपालिकेने कलम २७२ चे तरतुदीनुसार स्वत: त्या व्यवसायिकांना स्थलांतरीत करुन बसविलेला असुन मागील सुमारे ३० वर्षापासुन सदर व्यवसायिक त्याठिकाणी व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. त्यामुळे नगरपालिकेने वैधरित्या पारित

केलेला न.पा.ठ.क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ अशाप्रकारे रद्द करणे संयुक्तीक नसुन बेकायदेशीर ठरेल. तरी सदर प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा ही विनंती आहे.

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब,

**श्री.कैलास सोनवणे :-** सर्व नोंद करुन घ्या.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर साहेबा, मुझे बोलना है.

**मा.महापौर :-** बोला, बोला,

**श्री.जितेंद्र मराठे :-** रियाजभाई बोलो सुन रहे है सब.

**मा.महापौर :-** रियाजभाई बोलो.

**श्री.ललित कोल्हे :-** बोलो बोलो.

**मा.महापौर :-** रियाजभाई बोला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** रियाजभाई दो मिनीट रुको मुझे बोलना है. अध्यक्ष महोदया,

**श्री.रियाज बागवान :-** हॅलो, हॅलो.

**मा.महापौर :-** बोला रियाजभाई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मुझे बोलना है महापौरताई.

**श्री.जितेंद्र मराठे :-** रियाजभाई बोला पटकन.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मुझे बोलना है.

**श्री.कैलास सोनवणे :-** रियाजभाई, ईबा भाई बोलो जल्दी,

**श्री.प्रशांत नाईक :-** कोई बोलो पर बोलो जल्दी, रियाजभाई बोलो या ईबा पटेल बोलो.

**श्री.जितेंद्र मराठे :-** चार्जींग खत्म हो जाऐंगी जल्दी बोलो.

**श्री.रियाज बागवान :-** ईबा भाई तुम बोलो.

**मा.महापौर :-** रियाजभाई बोलो.

**श्री.रियाज बागवान :-** ये समिती जब बनी थी, तब मैंने रिझाईन किया था, तब मैंने बोला था की, ये समिती के अन्दर सेना से किसीको नही लिया है. तो इसमे निष्पण कैसे निकालेंगे, तो इस लिए मैंने रिझाईन किया था.दुसरा विषय ये था की, शहर के बिचसे स्थलांतर करके शिफ्ट किया था भंगार बाजार को ९९ साल का करार कर के. अभी हम वापस करार लाकर रद्द कर रहे है इनका करार. तो ये उचित नही है. तो मेरी सभागृहासे, शासनसे सबसे ये विनंती है. इसको प्रस्ताव ना देखते हुए ये देखा जाऐ की, इससे २००-२५० लोग है. जो अपना रोजीरोटी अपना पेट पालते है. तो उसके हिसाबसे उसका निर्णय लिया जाए. और प्रशासनने जो प्रस्ताव लाया है. एम.आय.एम. इसका विरोध करते है.

नगरसचिव :- रियाजभाई विरोध है क्या आपका ?

श्री.रियाज बागवान :- विरोध है विरोध है और जितना मैंने बोला वो सब रिकॉर्ड पर लेना है. एम.आय.एम.का विरोध पर जितना मैंने बोला है वो सारा की सारा रिकॉर्ड पर लेना है.

**नगरसचिव :-** ठिक है, ठिक है.

**मा.महापौर :-** ईबाभाई बोला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हॅलो हॅलो.

**मा.महापौर :-** बोला ईबाभाई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हॅलो, हॅलो.

**सौ.सैईदा शेख :-** महापौर साहब, मुझे बोलना है, हमारे गटनेताने जो बोला वो हमे मंजुर है.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हॅलो, हॅलो.

**मा.महापौर :-** बोला ईबाभाई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, माझी सभागृहाला विनंती आहे की, हा जो ठराव आणलेला आहे आणि हा जो अहवाल व ही समिती गठीत करण्यात आलेली होती. त्या समितीपैकी दोन लोकांनी राजीनामे दिलेले आहेत. एक गैरहजर आहे. भागतभाईंना समितीत घेतलेले होते. त्यांनी ही राजीनामा दिलेला आहे. आता त्यात उरले फक्त एक सदस्य श्री.नवनाथ दारकुंडे आणि सैईदाबी त्यांनाही गैरहजर दाखविलेले आहे. म्हणजे एकच सदस्यानी त्याच्यावर सही केलेली आहे. तर मा.महापौर सदर जागा ही आम्हाला सन १९९१ ला म्हणजे आज जवळपास ३० वर्ष झाले. ते असुन सुध्दा आम्ही नगरपालिकेचा सन १९९१ चा ठराव माझ्याकडे आहे. नगरपालिकेने आम्हाला विनंती केली, तर सन १९९१ ला हा ठराव

झाला. सि.स.नं.२९ब जागा भंगार बाजार करीता नगरपालिकाद्वारे देणेबाबत. भंगार बाजार जो कॉम्पलेक्स होता ते तोडुन आधी जागा आम्हाला दिली. नंतर ती जागा आम्हाला कमी पडली. क्रिस्टोन कन्स्ट्रक्शन या कंपनी कडुन आपण ५९५ चौ.मी. जागा ही विकत घेतली. आणि उर्वरीत भंगार बाजार तेथे स्थलांतरीत केला. परत परत अतिक्रमण हे शब्द वापरण्यात येतात. परंतु नगररचना मधील आरक्षण क्र.अ व ब च्या नुसार क्रिस्टोन कन्स्ट्रक्शन यांना आपण जागा दिलेली आहे. कोणताही मोबदला न देता देण्यात यावा. तरी जळगांव नगरपालिकेने आम्हाला त्यावेळी ती जागा ठरावाने दिली. आम्ही ती जागा स्थलांतरीत म्हणुन त्या ठिकाणी आम्ही व्यवसाय सुरु केला. व्यवसाय सुरु असतांना आता ही सर्वोच्च न्यायालयाचा जो २७२ कलम आहे. त्यावेळेला नगरपालिकेने कलम २७२ चा वापर करुन आम्हाला ती जागा दिर्घ मुदतीने दिलेली होती. परंतु आता आज या समितीच्या अहवालानंतर कोणाला काही करायचे असेल ते म्हणा, आज आम्हाला आमच्या अधिकारापासुन वंचित करण्याचा प्रकार हा सुरु आहे. तरी महानगरपालिकेला समितीने जो अहवाल दिलेला आहे तो खोटा असुन आम्ही जी उपसुचना मांडलेली आहे त्या उपसुचनेच पालन करुन त्याच्या मध्ये निर्णय घेण्यात यावा. आज १०००-१५०० लोकं तेथे पोट भरीत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, अध्यक्ष महोदया,

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ तुम्ही नंतर बोला, ईबाभाईच बोलण होऊन जावु द्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ज्या वेळेला आम्हाला दिले, त्यावेळेला टिप्पणी दिलेली आहे की, मानवतेच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या सहकार्याची साहनुभुतीपुर्वक जाणीव ठेवुन त्याची लहान होती तर त्याची सुध्दा नुकसानाची भरपाई म्हणुन देण्यात आलेली होती. आता फक्त एकच सदस्याची सही, भगतभाईंनी राजीनामा दिलेला आहे, रियाजभाईंनी राजीनामा दिलेला आहे. मी स्वत: ते बघितलेले आहे ते वाचल पण आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** भगतभाई यांनी स्पष्ट कराव की, राजीनामा दिलेला आहे की नाही.

**मा.महापौर :-** राजीनामा दिलेला नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** राजीनामा दिलेला आहे ताई, मी स्वत: प्रत्यक्ष माझ्या डोळयाहुन वाचलेला आहे. भगतभाईंशी बोलणे ही झाल होते तर त्यांनी सांगितले की, मैने राजीनामा दे दिया.पहेले लगता था की, दाल मे कुछ काला है अब तो ऐसे लगता की, पुरी दालीच काली है.

**श्री.प्रशांत नाईक :-** ईबा भाई, भगतभाई को बोलने लगाओ ना.

**श्री.सुनिल महाजन :-** अध्यक्ष महोदया त्यांना स्पष्ट करायला सांगावा राजीनामा दिलेला आहे की नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अध्यक्ष महोदया, सुप्रिम कोर्टाचे ही आदेश आहे. कायदे हे लोकांसाठी बनविले जातात. लोकांच्या फायद्यासाठी कायदे बनविले जातात. कायद्याचा वापर करुन नगरपालिकेने आम्हाला ते अलॅट केलेले आहे. त्या वेळेला २७२ जी कलम आहे त्यानुसार आम्हाला ती जागा देण्यात आलेली होती. आजही कॉंग्रेस भवन पासुन तर थेट नेवे आणि ते फ्रुट गल्लीपर्यंत महापालिकेची जी जागा आहे, आजही आपण ते महापालिकेच्या ताब्या का घेऊ शकलो नाही. कारण ती ही जागा ९९ वर्षाच्या कराराने दिलेली आहे. आजही ती जागा महापालिकेच्या ताब्यात नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, मला बोलायचे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तरी आमची विनंती आहे की, तुम्हाला जे निर्णय घ्यायचे आहे घ्या, परंतु लोकांच्या हिताचा निर्णय घ्या.

**मा.महापौर :-** बोला नवनाथ भाऊ.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** प्रभाग समिती क्र.०२ चे रेकॉर्ड चेक करा. लॉकडाऊनच्या वेळेस मी स्वत: ५-५ लाख रुपये भाडेपट्टी भरलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मा.महापौर महोदया, समितीवर ऑबजेक्शन घेत आहे ते माझे एकच म्हणणे आहे. ३ एम.आय.एम. आणि १५ नगरसेवक शिवसेनेचे असुन या १८ लोकांनी ठराव करावा आमची तटस्थ भुमिका राहीन.

**श्री.सुनिल महाजन :-** नवनाथ भाऊ आता सभापती निवड येत आहे, हीच तटस्थ भुमिका सभापती निवडच्या वेळेस घ्या मग, तुम्ही सत्ताधारी आहे म्हणुन कोणताही ठराव बहुमताने होत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुमचे १५ आणि एम.आय.एम. चे तीन ठराव करा ना. आम्ही तटस्थ राहु ना. लोकांना समजु तर द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** कोणता अभ्यास केला समितीने, कधी मिटींग घेतली, त्याच काहीच स्पष्टीकरण नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** एकपण मिटींग घेतली गेली नाही. भगतभाऊंनी राजीनामा दिलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो, मिटींग घेतली नाही तर मिटींगला गैरहजर कसे काय झाले आम्ही.

**श्री.सुनिल महाजन :-** जर मिटींग झाली तर त्याचे मिनीटस कुठे आहे. त्याचे मिनीटस दाखवा ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मिटींग झाली तर मिटींगचा अजेंडा दाखवा.

**श्री.सुनिल महाजन :-** मिनीटस असतील ना तर कुठे आहे मिटींगचे मिनीटस. आणि काय अभ्यास केला तुम्ही.

**श्री.प्रशांत नाईक :-** अप्पा आवाज येत आहे तुझा, महापौरांना आवाज येत नाही तुझावाला.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौर ताई, माझी विनंती आहे की, हा जो प्रस्ताव आलेला आहे, त्याच्यावर जे ईबाभाई बोलले आणि अप्पा बोलतील.त्यांचा जो विषय आहे रोजीरोटीचा आहे. मानवतेच्या दृष्टीने त्यांनी पहिल्यापासुन सहकार्य केलेले आहे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, आपण सर्वांनी आपले माईक बंद ठेवावे. मा.महापौर महोदया ज्यांना परवानगी देतील त्यांनीच बोलायचे ही विनंती आहे.

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.भगतराम बालाणी :-** पहिले मी बोलु का अप्पा, ठिक आहे, तुम्ही बोला अप्पा साहेब,

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.ललित कोल्हे :-** ताई म्हणत आहे ना, बोला अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** सदर जागा भाडे तत्त्वावर देणेबाबत तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. ती वास्तविक पाहता, नगरपालिका, नगरपंचायत, टाऊनशीपचे कलम ९२(२) अन्वये नगरपालिकेच्या मिळकती ३ वर्षाच्या भाडे कराराने देता येईल. व तद्नतर जास्तीत जास्त ९ वर्षाच्या मुदतवाढीसह कालावधीसाठी नगरपालिकास भाडेकरारावर देणेसाठी तरतुद आहे. मात्र ९ वर्षापेक्षा जास्त कराराने नगरपालिकेच्या मिळकती भाडेकराराने द्यावयाचे असल्यास कलम ९२(१) नुसार महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणे आवश्यक होती. परंतु अभिलेखे तपासले असता सदर ठरावाच्या प्रती तशी कोणतीही शासन परवानगी घेतलेली दिसत नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ जागा ही ९९ वर्षासाठी देणेसाठीची कोणतीही तरतुद नाही. स्पष्ट प्रस्ताव प्रशासनाचा आहे. त्यानंतर इबाभाई पटेल, गफ्फार भाई आणि नितीन भाऊ.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा २७६ (१) मध्ये ९२(१) ची बाधा येत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट ऐकुन घ्या तुम्ही इबाभाई. जर प्रशासनाचा प्रस्ताव चुकीचा असेल ना तर तुम्ही कोर्टात जाऊ शकतात.

**मा.महापौर :-** ईबाभाई स्पीकर बंद करा,

**श्री.कैलास सोनवणे :-** हे सर्व माझ्याकडे येऊन गेले, या विषयावरती सखोल चर्चा झालेली आहे. आमची साहनुभुती त्या बांधवांसोबत आहे. त्या ठिकाणी हिंदु आणि मुस्लीम दोन्ही व्यवसाय करतात. परंतु विषय असा आहे, जे चुकीचे घडलेले आहे.आणि प्रशासनाने मागच्या दोन वर्षापासुन हा प्रस्ताव आणलेला आहे. म्हणजे तुम्हाला संधी नाही दिली किंवा चान्स नाही दिला अश्यातला प्रकार नाही. संधी दिलेली आहे तुम्हाला सगळयांना, आणि प्रशासनातर्फे जो प्रस्ताव आला तो आम्हाला मान्य आहे. परंतु आमचे म्हणणे असे आहे की, प्रशासनाला त्या ठिकाणी जी लोक आहे मुस्लीम बांधव हिंदु बांधव आहेत. त्या लोकांना जर प्रशासनाने भाडयाने दिले तर प्रॉयरीटीने अगोदर त्याच लोकांना दिल पाहिजे. आणि जर लिलाव काढले तरी ही आमच म्हणण आहे की पहिले त्याच लोकांना द्या अशी सभागृहाला विनंती करणार आहे प्रशासनाला प्रशासनाचा प्रस्ताव आम्ही मान्य करत आहोत.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब, अप्पा म्हणत आहे हा प्रस्तावच चुकीचा आहे. महापौर साहेब त्यावेळेला अप्पा सुध्दा तत्कालीन नगरपालिकेला नगरसेवक होते. आणि हा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर झालेला आहे. सन १९९७ ला सर्वानुमते मंजुर आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सर्वानुमते मंजुर आहे अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा ठराव १९९१ चा आहे आणि १९९१ ला मी आलेलो नव्हतो. आपली ही तारीख आहे

**श्री.सुनिल महाजन :-** तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ त्या वेळेस अप्पा सुध्दा नगरसेवक होते. आणि तो विषय सर्वानुमते मंजुर झालेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ऐकुण घ्या सुनिल भाऊ ऐकुण घ्या.

**श्री.सुनिल महाजन :-** मग आता चुकीचा कसा आहे तो.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुरुवातीला १९९१ ला आला होता हा ठराव, त्या वेळेस मी नगरसेवक नव्हतो. आणि जे जे आम्ही चुकीचे केलेले आहे त्याचे फळ आम्ही भोगलेले आहे. तुम्हाला पण भोगायचे आहे का त्याचे फळं, जे चुकलेल आहे त्याचे फळ आम्ही भोगलेले आहे आम्ही सर्वांनी.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौर ताई, सुनिल भाऊ,

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता याच्यापुढे कोणीच बोलु नका.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हे मार्केटचे विषय ४ वर्षापासुन लटकुन ठेवलेले आहे ते चुकीचे नाही का ?

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताई आवाज येत आहे का? मी बोलु का ?

**मा.महापौर :-** एक एक जण बोला. ऐकायला येत नाही व्यवस्थीत, बोला भगतभाई बोला.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताई, जे काही रियाजभाई, ईबाभाई आणि शेख ताई यांनी सुचना मांडल्या, मी त्याच्यावर ही अप्पा साहेबांना प्रस्ताव वाचुन दाखविला आणि माझे म्हणणे आहे की, या गोष्टीला कुठेही फाटा न येता अनेक वर्षापासुन तेथे हे होते, तेथुन हे शिफ्ट झाले, मान्य आहे. ही त्यांची उपजिवीका आहे, त्यांना सहानभुती म्हणुन त्यांचा रोजीरोटीचा प्रश्न आहे. सहानभुतीपुर्वक घेऊन काही तरी मध्यम मार्ग काढावा, आणि या विषयाला अजुन कोणीही फाटा देऊ नका, माझी सभागृहाला विनंती आहे आणि सभागृहाने मध्यम मार्ग काढावा.

**मा.महापौर :-** सुचक आणि अनुमोदक कोण आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आयुक्त साहेबांनी सांगावा की काय मार्ग काढणार आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, आमची ही सभागृहाला विनंती आहे की, ३० वर्षापासुन आम्ही तेथे व्यवसाय करीत आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** तुमच नुकसान होणार नाही याची आम्ही दक्षता घेऊ.

**मा.महापौर :-** सुचक कोण आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अनुमोदन आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** याच्यावर सविस्तर चर्चा तर करु द्या. चर्चा तर होऊ द्या. जे मंजुर करायचे आहे तुम्ही ते मंजुर करुन घ्या पण ऐकुन तर घ्या सदस्यांच काय म्हणणे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आम्हाला क्लियर करा की, काय झालेल आहे.

**श्री.सचिन पाटील :-** विषयपत्रिकेवरील पुढील विषय घ्यावा.

**सौ.सैईदा शेख :-** महापौर साहेब, हमारे गटनेताने जो बोले, हम उनके साथ है.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता गटनेते भगतभाई बालाणी यांनी जो ठराव मांडला.

**श्री.भगतराम बालाणी :-** कैलास अप्पांनी सांगितल म्हणुन त्यांच्या म्हणण्यावरुन मी सुचना मांडली.

**श्रीमती.सुन्नाबी देशमुख :-** नितीन भाऊ, भंगार बाजार का क्या करते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** भगतभाई हम भी तुम्हारे साथ है. भगतभाई आप व्यापारीयों के साथ है.

**श्री.विष्णु भंगाळे :-** भगतभाई मी वेगळं म्हटलेल नाही. आपण मांडलेली सुचना, महापौर महोदया मी वेगळ मांडत नाही, आपण मांडलेले ठरावावर सुचक अनुमोदक घेत आहात. त्याच्यात ईबाभाई, भगतभाई यांनी मांडलेल्या सुचनेनुसार आपण देत आहात का ? याचे स्पष्टीकरण सभागृहाला होणे गरजेचे आहे.

**सौ.सैईदा शेख :-** रियाजभाईने जो बोले, हम उनके साथ है.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आम्ही आमची भुमिका कश्या बाबतीत घ्यायची आम्हाला हे तर समजु द्या.

**मा.महापौर :-** बोला नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई आता पर्यंत आपण चर्चा घेतली परंतु बनविण्यात आलेल्या समितीच्या अहवालावरुन हा विषय महासभेच्या पटलावर आलेला आहे. पण समिती गठण करण्याच्या संदर्भातली कलम ३० आणि ३१ अन्वये केले त्याची त्यांनी वाचन करावी. ही समिती जी गठीत करण्यात आलेली आहे. ही समितीच मुळात चुकीच्या पध्दतीने गठीत करण्यात आलेली आहे. ही समिती बेकायदेशीर रित्या गठीत झालेली आहे. ही समिती बेकायदेशीर रित्या गठीत करण्यात आलेली असुन अत्यंत दुर्भाग्यपुर्ण म्हणाव लागेल की, समितीचे गठणच जर नियमात झालेले नाही तर कलम ३० आणि ३१

नुसार ही समिती बेकायदेशीर गठीत करण्याचा दाखला देते. याच्या मध्ये सर्व पक्षीय सदस्यांचे बलाबल पाहुन त्या पक्षीय सदस्यांची संख्या त्याच्यामध्ये निर्धारीत करणे अपेक्षित असते. परंतु याच्यामध्ये कुठल्याही पध्दतीने पक्षीय बलाबल न पाहता ही समिती गठीत करण्यात आलेली आहे. जी मुळात बेकायदेशीर आहे. आणि एखाद्या बेकायदेशीर गठीत झालेल्या समितीने याच्या संदर्भात जो अहवाल दिलेला आहे तो ही बेकायदेशीरच धरला जाईल. म्हणुन मला वाटत की, हा जो प्रस्ताव आलेला आहे हा प्रस्ताव परत पाठवायला पाहिजे. पुन्हा आपण नविन पध्दतीने आपण समिती गठीत करावी. योग्य पध्दतीने संपुर्ण पक्षीय बलाबलाच्या अनुषंगाने सर्व पक्षीय सदस्यांना त्याच्या मध्ये स्थान द्यावा आणि जे काही त्या समिती सदस्यांचा अंतिम निर्णय येईल त्या पध्दतीने ते अहवाल आल्यानंतर महानगरपालिकेच्या पटलावर ठेवल्यानंतर जो काही निर्णय आपल्याला घ्यावयाचा असेल, बहुमत आपल्याकडे आहे. परंतु कमीत कमी बहुमताने निर्णय घेतांनाही नियमांची पायमल्ली होणार नाही. याच्या संदर्भात ही दक्षता घ्यावी. आणि तात्काळ हा विषय तहकुब करावा. मा.नगरसचिव साहेबांना विनंती आहे माझी की, समितीचे गठण योग्य आहे किंवा कसे याबाबतीत त्यांनी पहिले खुलासा करायला पाहिजे. आणि तो खुलासा झाल्यानंतर ही गठीत समिती ही कायदेशीर आहे तर निश्चितपणे आपण तो निर्णय घ्या. ही गठीत झालेली समिती कायदेशीर रित्या अयोग्य आहे. बेकायदेशीर असेल तर तश्या पध्दतीने प्रस्ताव तहकुब करुन पुढच्या महासभेमध्ये नविन समिती गठीत करुन नविन समितीची जी भुमिका असेल सभागृहासमोर येऊ द्यायची त्यानंतर जे काही योग्य निर्णय आपल्याला घ्यावे असेल ते घ्या ते सभागृहाचा अधिकार आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.रियाज बागवान :-** यही वजा से मैने समितीसे रिझाईन किया था.

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब. बोला अप्पा साहेब.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बोला अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब, आवाज येत आहे. महापौर साहेब, ज्या वेळेस समितीचे गठन झाले होते ना. त्यावेळेस ते समितीत होते, परंतु त्यांनी त्या वेळेस ऑब्जेक्शन घेतले नाही. आता बोलण्याचा काही अर्थ नाही. समितीचा अहवाल येऊन गेलेला आहे.

**श्री. ईब्राहिम पटेल :-** अप्पा दोन लोकांनी राजीनामा दिलेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई अभी मै बोलु की नही बोलु.

**श्री. ईब्राहिम पटेल :-** नही बोलो बोलो अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** हम रुके की नही आपने बोले तो. आम्हाला प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे. आम्ही सुचक अनुमोदन ही दिलेले आहे. आम्हाला त्या लोकांशी सहानभुती आहे. त्या लोकांना प्रायर्टी देण्यात यावी. ईबाभाई माझ्याकडे येऊन गेले, गफ्फार भाई, नितीन भाऊ हे तिघही त्या दिवशी होते.आणि ते नागरीक ही त्यांच्यासोबत होते. तेव्हा याबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे. आणि त्या चर्चेच्या अंती ठरलेले होते. तुम्ही तुमची ऑफर द्या प्रशासनाला, त्या प्रमाणे ही करता यईल. मी तुम्हाला भारतीय जनता पार्टीच्या वतीने अश्वस्त करु ईच्छितो की, ऑफर द्या प्रशासनाला ती योग्य असेल नियमात असेल तर ती जरुर मान्य करण्यात येईल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आम्ही तर ऑफर दिलेली आहे ना, आयुक्त साहेब माहिती देतील.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ. भारतीय जनता पक्षाने या प्रस्तावाला सुचक आणि अनुमोदन दिलेले आहे आपली काय भुमिका आहे ? शिवसेनाची काय भुमिका आहे.

**श्री.विष्णु भंगाळे:-** समिती कायदेशीर आहे का ? फक्त इतके उत्तर द्या. हो किंवा नाही.

**श्री.नितीन लढढा :-** याची सविस्तर माहिती द्या की, आम्हालाही योग्य पध्दतीने निर्णय घेता येईल.

**नगरसचिव :-** आवाज येत नाही भाऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ या गोष्टीला आता काही अर्थ नाही. काही अर्थ नाही आता.

**श्री.सुनिल महाजन :-** आम्ही नगरसचिवांना विचारत आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ताई, त्यांच बोलण झाल्यावर आम्ही सुरु झालो, आणि परवानगी घेतल्या शिवाय आम्ही कधीच बोलत नाही.

**मा.महापौर :-** आवाज येत नाही. विष्णु भाऊ एका टाईमाला एकच बोला नितीन भाऊ बोलत आहे ना. एका वेळेला सर्वांचा आवाज येतो ना तर काहीच ऐकु येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अच्छा अच्छा ठिक आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय भाऊ. भाजपा ने त्यांची भुमिका स्पष्ट केलेली आहे. आपली भुमिका काय आहे ?

**श्री.नितीन लढढा :-** नगरसचिव महोदय, आमच ऐवढच म्हणण आहे की, आम्ही जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्या मुद्दयाच्या अनुषंगाने आपण आम्हाला थोडस समाधान करुन द्यावा की, ही समिती कायदेशीर रित्या गठीत झालेली आहे की बेकायदेशीर आहे. म्हणजे आम्हाला आमची भुमिका कळविणे योग्य होईल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा तुर्ते हा ठराव रद्द करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** ईबाभाई नगरसचिव को बोलने दो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ठिक है.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आवाज येत नाही कोणाचा.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभा सुरु आहे की, बंद झाली.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ, नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** हो महापौरताई.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ, आम्ही प्रस्ताव मंजुर केलेला आहे, समिती बद्दल काहीच म्हणण नाही आमच.

**श्री.सुनिल महाजन :-** तुमच म्हणण नाही आमच म्हणण आहे. पण गोराणे साहेबांनी आम्हाला सांगाव की, समिती कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** समिती बेकायदेशीर अशीन तर विखंडणाला जाईन ठराव.

**श्री.नितीन लढढा :-** आमच म्हणण पण हेच आहे की, समितीच्या अहवालावरती सर्व निर्णय प्रक्रिया अवलंबुन आहे. आणि समिती योग्य आहे की अयोग्य आहे हा आमचा छोटासा आणि कायदेशीर प्रश्न आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जेव्हा समिती गठीत झाली तेव्हा तुम्ही सर्व शांत होते तेव्हा कोणीही ऑब्जेक्शन घेतले नाही. कोणीही काहीच बोलले नाही.

**श्री.**नितीन लढढा :- त्यावेळेची रिकॉर्डीग काढुन बघा आपण त्या वेळेला सुध्दा आक्षेप नोंदविला आहे. आपण त्यावेळेची रिकॉर्डीग सुध्दा तपासु शकता. आम्ही त्यावेळेस ही आक्षेप घेतलेला होता.

**श्री.कैलास सोनवणे :-** शिवसेनेचा सदस्य का नाही दिला तुम्ही तेव्हा ?

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा आम्ही नगरसचिवांना विचारत आहे प्रश्न प्रशासनाला विचारत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बस आता झाल ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** दोन वर्ष पेंडीग पडला हा विषय तुम्हाला अजुन पेंडीग पडु द्यायचा आहे का ?

**श्री.सुनिल महाजन :-** कशामुळे पेंडीग पडला हा ?

**श्री.कैलास सोनवणे :-** समिती गठीत झाल्यामुळे,

**श्री.सुनिल महाजन :-** नाही, नाही कारण दोन महिन्याने विधान सभेची निवडणुक होती. म्हणुन हा विषय तहकुब ठेवला होता.

**श्री.नितीन लढढा :-** बरोबर आहे बरोबर आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अप्पा साहेब समिती कोणी गठीत केली होती.

**श्री.नितीन लढढा :-** कही पे निगाहे कही पे निशाना.

**मा.महापौर :-** ही समिती महासभेने गठीत केलेली आहे. आम्ही विषय मंजुर केलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आमच विरोध आहे या गोष्टीला कारण बेकायदेशीर कुठल्याही निर्णयामध्ये शिवसेनेचे कुठलेच प्रतिनिधी भाग घेणार नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौर महोदया आपण पुढचा विषय घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नगरसचिवांच म्हणण या विषयावर यायला पाहिजे. तुम्हाला जे मांडायच आहे ते मांडा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया आपण पुढचा विषय घ्यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आमचा विरोध आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब पुढचा विषयाचे वाचन करा.

**नगरसचिव :-** आदरणीय भाऊ, आदरणीय नितीन भाऊ, सभागृहाने हा बहुमताने मंजुर केलेला आहे, एम.आय.एम.चा विरोध आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ बरोबर आहे तुमचे म्हणणे पण आम्हाला तुम्ही हे तर सांगा की, ही समिती कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे.

**नगरसचिव :-** भाऊ आदरणीय नितीन भाऊ भा.ज.पा.ने ऑलरेडी हा प्रस्ताव मंजुर केलेला आहे. आपली भुमिका काय आहे? या विषयाला आपली भुमिका काय?

**श्री.सुनिल महाजन :-** बहुमताने तो मंजुर होणारच आहे पण त्यांच्याही सदस्यांना प्रश्न चिन्ह आहे की, समिती कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे.

**नगरसचिव :-** महापौरांचे मला तसे काही निर्देश नाही दिलेत. तरी ही आपली भुमिका काय आहे ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आपल्यावरती आरोप करीत आहे की, हे सांगु देत नाही की, समिती कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे.

**मा.महापौर :-** महासभेने गठीत केलेली आहे ती समिती.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ, नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** आता या सभागृहामध्ये जी समिती गठीत करण्यात आलेली होती. ती समितीचे गठण कायदेशीर आहे की नाही, प्रशासन समाधानकारक उत्तर देत नाही.प्रशासनाची जर मुस्तकदारी होत असेल तर हे ही योग्य नाही. तर या अनुषंगाने सदरहु आलेल्या विषयाला आमचा विरोध आहे.

**नगरसचिव :-** विरोध आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**नगरसचिव :-** एम.आय.एम.चा विरोध आहे, शिवसेनेचा विरोध आहे. भाजपाने हा विषय बहुमताने मंजुर केलेला आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, सि.स.क्रं.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरिता भाडेतत्वाने देणेबाबतचा प्रस्तावास तत्कालीन न.पा.ठराव ठराव क्रं.३३७ दि.२५/१०/१९९७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे तसेच सदर ९९ वर्षाच्या करारास मा.शासनाच्या मंजूरी घेणेकरीता शासनाकडेस पाठविणे कामी ही मंजूरी देण्यात आलेली होती.

परंतु वास्तविक पाहता महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत व इंडस्ट्रीयल टाऊनशिप अधिनियम १९६५ चे कलम ९२ (२) अन्वये नगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती नगरपालिकेस ३ वर्षापर्यंत भाडेकराराने देता येईल व तद्नंतर २ मुदतवाढीसह जास्तीत जास्त ९ वर्षाच्या कालावधीसाठी नगरपालिकेला भाडेकराराने देण्याबाबतची तरतुद आहे मात्र ९ वर्षापेक्षा जास्तच्या कालावधीसाठी नगरपालिकेच्या मिळकती भाडेकराराने दयावयाचे झाल्यास कलम ९२ (१) नुसार महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते परंतु अभिलेखे तपासले असता सदर ठरावाबाबत कोणतीही शासन परवानगी घेतल्याचे दिसत नाही तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये ही महानगरपालिकेची जागा ९९ वर्षाने भाडे तत्वाने देणेबाबत कोणतीही तरतूद नाही.

महानगरपालिका अधिनियमातील कलम ३ (३) ३ ब तसेच कलम ४९३ परिशिष्ट चार मधील ५ मध्ये महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये नियत दिवसांच्या निकटपुर्वी शहर म्हणून रचना करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात उमला असलेल्या अन्य कोणत्याही कायदयान्वये केलेली नेमणूक, काढलेली अधिसुचना, नोटीस, आदेश, योजना, परवानगी, यथस्थिती, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नेमणूकीने, अधिसूचनेने, नोटीशीने, आदेशाने, योजनेने, परवानगीने त्याचे अधिक्रमण येईपर्यंत या अधिनियमाच्या तरतूदीशी विसंगत नसेल तेथवर अंमलात असल्याचे चालू राहील असे नमूद आहे त्यानुसार सि.स.क्रं.२९-ब हल्लीचा भंगार

बाजार ९९ वर्षाकरिता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन न.पा.ठराव ठराव क्रं.३३७ दि.२५/१०/१९९७ हा महानगरपालिका अधिनियमातील कलम ३ (३) ३ ब तसेच कलम ४९३ परिशिष्ट चार मधील ५ नूसार रद्द करणेबाबतचा प्रस्ताव दि.०५/०३/२०१९ रोजी संपन्न झालेल्या विशेष महासभेतील विषयपत्रिकेतील विषय क्रं.२ अन्वये प्रशासनाकडुन सादर करण्यात आला असता सदरचा प्रस्ताव विशेष महासभा ठराव क्रं.११७ दि.०५/०३/२०१९ अन्वये अनिश्चित काळासाठी तहकूब ठेवणेत आलेला होता. सदर विषय पुन:श्च दि.०३/०८/२०१९ रोजी चे महासभा विषय क्रं.११ अन्वये सभेपूढे निर्णयास्तव आला असता महासभा ठराव क्रं.१८० दि.०३/०८/२०१९ अन्वये सि.स.क्र.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन नगरपालिका ठराव क्रं.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेबाबतच्या प्रस्तावावर पुर्नविचार करुन अभ्यासपुर्वक निर्णय घेणेकामी ०४ सन्मा.सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीच्या दोन सदस्यांच्या दि.२६/०३/२०२० रोजीच्या कामकाजानुसार प्रशासनाचा सि.स.क्रं.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन नगरपालिका ठराव क्रं.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेबाबतचा प्रस्ताव योग्य असून सहमत असलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

प्रशासनाने दि.२०/०२/२०१९ रोजी सादर केलेला सि.स.क्रं.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन नगरपालिका ठराव क्रं.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३ (३) ३ब तसेच कलम ४९३ परिशिष्ट चार मधील ५ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी अधिनियमातील तरतूदी, शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ४७ प्रतिकुल मते :- १३**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** प्र.क्र. १ ते १९ मधील रस्ते डांबर मिश्रीत खडीने बुजविणेचे काम सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी शहरातील रस्ते दुरुस्ती कामी रु.१५ कोटी या अर्थ संकल्पीय तरतुदीतुन करुन घेणेसाठी अंदाजीत खर्च रक्कम रु.९,२०,८५,०६१/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदरील प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौर ताई.

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो, हॅलो.

**मा.महापौर :-** बोला नितीन भाऊ

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, आपण ९.५ कोटी रुपये रस्त्यांचे खड्डे बजविणे करीता मंजुर करीत आहे. मी आयुक्त साहेबांना विचारु ईच्छितो की, नंदनवन कॉलनीत एक पुल वाहुन गेलेला आहे, ५ लाखाची आपल्याकडे मागणी करीत आहे. आपले शहर अभियंता त्या ठिकाणी बघुन आलेले आहे. त्याठिकाणी लोकांना जायला रस्ता नाही. त्याच्या संदर्भात शहर अभियंता यांनी काय केलेले आहे.

**मा.महापौर :-** खडके साहेब बोलत आहे.

**श्री.डी.एस.खडके :-** प्रस्तावीत काम १०० कोटी अनुदानातुन मंजुर झालेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** खडके साहेब तो तर स्थायी समितीत विषय झाला आपला ४२ कोटी मध्ये मंजुर आहे सर्व आहे. त्या ४२ कोटीची ही यंत्रणा आपल्याकडे नाही. ५ लाखाकरीता आज तेथे लोकांची जायची व्यवस्था नाही. त्याची काय उपाययोजना केली आपण ? ते १०० कोटी सांगु नका.

**श्री.डी.एस.खडके :-** त्या विभागाच्या क.अभियंताला प्रस्ताव द्यायला सांगितलेला आहे, त्यापैकी अर्धा रस्ता सुरु आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तेथे तुम्ही पाहुन आले ना परिस्थिती काय आहे नंदनवन कॉलनीची ?

**श्री.डी.एस.खडके :-** बघितलेली आहे अर्धा भाग वाहुन गेलेला आहे अर्ध्या भागात वाहतुक सुरु आहे आणि दुरुस्तीच्या अनुषंगाने क.अभियंता यांना सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** किती दिवस झाले आपल्याला ही गोष्ट करुन २० दिवस होऊन गेले. ८ दिवसांनी तुम्ही रिटायर होणार.

**श्री.डी.एस.खडके :-** दोन दिवसात त्यांच्याकडुन एस्टिमेट मागवितो.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, महापौर साहेब, महाबळ माझ्या घरापासुन ते गाडगेबाबा चौकापर्यंत एक एक फुटाचे खड्डे पडलेले आहे. तेथे ट्रॅक्टर भरुन कोणीही मुरुम टाकायला तयार नाही. ट्रॅक्टरवर माणस नाही. हॅलो हॅलो ,

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा महाबळ चौकात तुम्ही जा गाडगेबाबा चौकापर्यंत, एक एक फुटाचे खड्डे आहे त्या रस्त्याला, कोणीही बुजायला तयार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**श्री.विष्णु भंगाळे :-** अप्पा साहेब तुम्ही महापौर महोदयांच्या निर्देशाने त्या रस्त्यावरचे व जळगांव शहरातील खड्डयांचे प्रकरण हातात घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** घेतल ना. ऐका ना तुम्ही वाचा ना तो विषय तोच आहे खड्डयांचेच आहे. आणि आपण कमीत कमी ४२ कोटीचे रस्ते प्रस्तावीत केलेले आहे. पुढचे विषय आणखी आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अप्पा साहेब मान्य आहे. परंतु होतील कधी. जळगांव शहरातील खड्डयांची पहिली प्रायोरिटी आपण घेतली पाहिजे. खड्डे बुजायच तरी काम हातात घेतल पाहिजे. याला वेळ लागेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** अस समजा, लगेच टेंडर निघतील खड्डे बुजविणेचे, लगेच ४-५ दिवसात.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा ते जाऊ द्या. आज तेथे ॲक्सीडेंट होतात. दोन ट्रॅक्टर मुरुम आणायला काय जात त्यांच. दोन ट्रॅक्टर मुरुम आणायला यांच कितीक जाणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आवाज का येत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा तुम्ही मुद्दामुन आवाज दाबतात आमचा तिथुन तुम्ही सभागृहात बसलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ तसे काहीच नाही. आवाजच येत नाही. वरतुनच काही तरी आहे. मी काय म्हणत आहे. आता खड्डे बुजविले जातील सर्व प्रभागाचे तुमच प्रभाग ही घेतलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा हे मान्य आहे मला, खड्डे बुजले जातील. पण आज दोन ट्रॅक्टर मुरुम आणु शकत नाही का?

**श्री.कैलास सोनवणे :-** का आणु शकत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा मला जे.सी.बी. आणि ट्रॅक्टर द्या. मी ५-६ ट्रॅक्टर मुरुम टाकुन देतो तेथे आजच्या आज.

**श्री.कैलास सोनवणे :-** दिले होते ना तुम्हाला मागे. परत सांगतो त्यांना द्यायच. मिटींग होऊ द्या आपण परत बसु आणि त्यांना सांगतो मी.

**श्री.नितीन बरडे :-** मला आजच्या आज द्या संध्याकाळ पर्यंत मी ५-६ ट्रॅक्टर मुरुम टाकुन देतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** खडके साहेब, नितीन भाऊ काय म्हणत आहे त्यांची समस्या सोडवा आजच्या आज ट्रॅक्टर द्या आणि मुरुम टाकुन द्या.

**श्री.डी.एस.खडके :-** हो अप्पा साहेब.

**श्री.नितीन बरडे :-** खडके साहेब, खडके साहेब, मी दोन कोटीच्या रस्त्यांच्या चौकशीसाठी मी तुम्हाला दिले होते त्याच काय झाल.

**श्री.डी.एस.खडके :-** चौकशी संपलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट,

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा माझ्या वार्डातील रस्ते दुरुस्तीचे होते झाले नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट, एक मिनीट एक एक विषय घ्या.मी तुम्हाला सांगुन ठेवतो खडके साहेब. खडके साहेब आणि प्रशासनाला विनंती करतो की, नितीन बरडे असो की, सन्मा.नगरसेवक कोणीही त्यांना जे.सी.बी. मागण्यासाठी महापौरांची किंवा महापौरांच्या प्रतिनिधीची आवश्यकता पडायला नाही पाहिजे. त्यांनी मागीतल्या बरोबर त्यांना द्यायला पाहिजे. प्रशासनाला विनंती आहे माझी आणि सन्मा.नगरसेवक नितीन भाऊ काय बोलले त्याचही उत्तर द्या.
**श्री.सुनिल खडके :-** आम्हाला ही मिळायला पाहिजे अप्पा.
**श्री.कैलास सोनवणे :-** सर्वांना सर्वांना. नंबर प्रमाणे एक एक करुन सर्वांना मिळायला पाहिजे.
**श्री.डी.एस.खडके :-** ठिक आहे. काळजी घेऊ.
**मा.महापौर :-** पुढचा विषय घ्या.
**श्री.नितीन बरडे :-** खडके साहेब चौकशीच काय झाल. कामे झालेली नाही तुम्ही बिल घुमविले आहे का?
**श्री.डी.एस.खडके :-** आयुक्त साहेबांनी चौकशी समिती केलेली आहे. मुख्य लेखा परिक्षक यांच्या अधिपत्याखाली. शहर अभियंता आणि मुख्य लेखा परिक्षक, १९ आणि २२ तारखेला काम झालेले आहे. मागच्या स्थायी समितीला ही मी आश्वासन दिल होत की, २५ तारखेपर्यंत मी माझा अहवाल देणार.
**श्री.नितीन बरडे :-** ठिक आहे. अजुन दोन दिवस आजची २३ तारीख आहे.
**नगरसचिव :-** विषय क्र.०४ रियाजभाई सर्वानुमते मंजुर आहे ना.
**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य.
**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर आहे.
**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ. विष्णु भाऊ मंजुर आहे ना. विषय क्र.०४ सर्वानुमते मंजुर आहे ना. सर्वानुमते मंजुर आहे.
**श्री. विष्णु भंगाळे :-** विषय क्र.०४ सर्वानुमते मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरात गेल्या पंधरा दिवसापुर्वी झालेल्या सतत पावसामुळे तसेच शहरात बऱ्याच वर्षापासुन नविन रस्त्याचे काम हाती घेण्यात आलेले नसल्याने शहरातील रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. या अनुषंगाने बांधकाम विभागाकडील सर्व शाखा अभियंता यांच्या मार्फत निवडणुक प्रभाग क्रं.१ ते १९ मधील रस्ते डांबर मिश्रीत खडीने दुरुस्त करणे कामी खालील प्रमाणे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहेत. दि.०२/०९/२०२० रोजी मा.महापौर यांचेकक्षात मा.महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व इतर पदाधिकारी तसेच आयुक्त यांचे समक्ष शहरातील रस्त्यावर पडलेले खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी निवडणुक प्रभाग निहाय किमान रु.५० लक्षची तरतुद करुन अंदाजपत्रक तयार करणे संदर्भात प्रत्यक्ष सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने शहरातील एकूण १९ प्रभागा मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी एकूण रक्कम रु.९,२०,८५,०६१/- मात्र चे अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरचा खर्च हा सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी शहरातील रस्ते दुरुस्ती कामी रु.१५ कोटी या अर्थ संकल्पीय तरतुदीत करणेत यावा. तसेच प्रशासनाने खालील कामे करणे कामी प्रभागनिहाय स्वतंत्र निविदा काढावी.

| अ.क्रं. | कामांचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४८,५५,३४८/- |
| २ | प्रभाग क्र.२ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४८,२८,७९५/- |
| ३ | प्रभाग क्र.३ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,७७,१६२/- |
| ४ | प्रभाग क्र.४ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,६४,६३६/- |
| ५ | प्रभाग क्र.५ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,८७,२५८/- |
| ६ | प्रभाग क्र.६ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४०,२८,६०२/- |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्रभाग क्र.७ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४८,४५,१९६/- |
| ८ | प्रभाग क्र.८ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४७,७५,२१२/- |
| ९ | प्रभाग क्र.९ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४८,६१,७१४/- |
| १० | प्रभाग क्र.१० मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,३९,६४७/- |
| ११ | प्रभाग क्र.११ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,८०,६७९/- |
| १२ | प्रभाग क्र.१२ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,८२,७७२/- |
| १३ | प्रभाग क्र.१३ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,८२,९९३/- |
| १४ | प्रभाग क्र.१४ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,८७,२९७/- |
| १५ | प्रभाग क्र.१५ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४५,६३,२२१/- |
| १६ | प्रभाग क्र.१६ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,७६,९५४/- |
| १७ | प्रभाग क्र.१७ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४९,३१,४०६/- |
| १८ | प्रभाग क्र.१८ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४८,०१,१४०/- |
| १९ | प्रभाग क्र.१९ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे. | ४८,१५,०२९/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **९,२०,८५,०६१/-** |

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** आसोदा रोड परीसरात मोहन टॉकीजपूढे श्रीराम चौकामध्ये रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण न करता दुध बुथ केंद्र उभारणेस परवानगी मिळणेबाबत श्री.छोटू एकनाथ सपकाळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, जळगांव शहरात जेवढे असे प्रस्ताव असतील, संपुर्ण प्रस्ताव एकाच येच्यात घ्या, सगळयांना मंजुरी द्या, परंतु दुसऱ्या गोष्टीचे अतिक्रमण होणार नाही, तेथे दुसरे व्यवहार होणार नाही हे लक्षात घ्या.
**मा.महापौर :-** हो हो.
**नगरसचिव :-** विष्णु भाऊ आदरणीय विष्णु भाऊ. रियाज भाई आदरणीय रियाज भाई.
**श्री.रियाज बागवान :-** मंजुर मंजुर.
**श्री.ईब्राहिम पटेल :-** शिवसेनेकडुन विषय क्र.५ चा प्रस्ताव मंजुर.
**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे ताई.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री.छोटू एकनाथ सपकाळे, राहणार असोदा रोड, मोहन टॉकीज जवळ, के.सी.नगर,जळगांव यांनी कुटूंबाचे उदरनिर्वाह करणेसाठी आसोदा रोड परीसरात मोहन टॉकीजपूढे श्रीराम चौकामध्ये रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण न करता दुध बुथ केंद्र उभारणेस परवानगी मिळणेबाबत केलेल्या मागणीनूसार दुध-बुथ केंद्र सुरु करणेस खालील अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात

येत आहे. यापूर्वी दुध विकास केंद्र चालविणेस महासभा ठराव क्रं.२५२ दि.११/०२/२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अटी-शर्ती सदर दुध बुथ धारकास सुध्दा लागू राहतील.

**अटी-शर्ती :.**

१) दुध बुथ केंद्रामध्ये दुध व दुधजन्य पदार्थ, बिस्कीट,खारी, टोस्ट व पाणी बोटल विक्रीस ठेवता येतील त्या व्यतिरिक्त तंबाखू, गुटका, सिगारेट तसेच अंमली पदार्थ व इतर पदार्थ आढळल्यास मुदतवाढ रद्द करण्यात येईल.

२) दुध बुथ केंद्रधारकाने दुध बुथ केंद्रापासुन कोणत्याही प्रकारे रहदारीस अडचण निर्माण होणार नाही या बाबतचे प्रमाणपत्र शहर वाहतुक विभागाकडून प्राप्त करुन म.न.पा.कडेस देणे बंधनकारक राहिल.

३) उपरोक्त नमुद विकास दुध बुथ धारकास ३ वर्षासाठी परवानगी देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** मौजे पिंप्राळा शिवार गट नं.९३ मधील खुली जागा विकसीत करुन तंटया भिल्ल संस्था,जळगांव या संस्थेस मिळणेबाबत सन्मा.सदस्या सौ.पार्वताबाई दामु भिल यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ही जी जागा आहे. गट नं.९३ ही अतिशय छोटी जागा आहे. तर त्याला लागुनच महानगरपालिकेची गट नं.९२ ही जागा तेथे उपलब्ध आहे. त्यांना गट क्र.९२ आणि ९३ दोन्ही जागा त्यांना द्या. मला अशी विनंती करायची आहे की, हा जो वार्ड आहे हा एस.टी.वार्ड आहे. समाजातील दुर्बल घटकाचा विचार करता आपण महापालिकेमार्फतच ती जागा विकसीत करुन दिली पाहिजे. त्यानुसार हा ठराव करण्यात यावा. गट क्र.९२ आणि ९३ या दोन्ही जागा तंटया भिल संस्था त्यांना विकसीत करुन त्यांना देण्यात यावा ही सभागृहास विनंती आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.पार्वताबाई भिल :-** अनुमोदन आहे.

**नगरसचिव :**- विषय क्रमांक.०६ आदरणीय नितीन भाऊ. आदरणीय रियाज भाई. हे ठराव सर्वानुमते आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो सर्वानुमते आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मौजे पिंप्राळा शिवार गट नं.९३ मधील खुली जागा ही अतिशय छोटी आहे. त्यास लागुनच गट नं.९२ आहे. सदरील जागा देखिल महानगरपालिकेचीच मिळकत आहे. तसेच सदरील वार्ड हा एस.टी. राखीव वार्ड आहे. एस.टी. समाज हा समाजातील अत्यंत दुर्बल घटक आहे. तसेच एस.टी. समाजासाठी कोणताही राखीव निधी येत नाही. सबब वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करता मौजे पिंप्राळा शिवार गट नं.९२ व गट नं.९३ मधील खुली जागेचा अदयाप पावेतो विकास झालेला नसल्याने सदर जागा तंटया भिल्ल संस्था, जळगांव या संस्थेस विकसीत करुन संरक्षण भिंत व विकास कामे करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिले नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**

**अनुमोदक :- भिल पार्वताबाई दामू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** सन २०२०-२०२१ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त निधी किंवा पुर्ननियोजन मधील निधीतून प्रभाग क्रं.१० मधील प्रस्तावित ०८ कामे मंजूर करणे कामी सन्मा.सदस्य श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर महोदया मला बोलायचे आहे या विषयावर.

**मा.महापौर :-** बोला भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर महोदया, सन्मा.सभागृह आणि सन्मा.व्यासपीठ माझी आपल्याला विनंती आहे की, प्रभाग क्र.१० पिंप्राळा हा भाग अगोदर महानगरपालिका, नगरपालिका होण्याच्या पहिले ही ग्रामपंचायत होती. काही २०-२५ वर्षापुर्वी पिंप्राळा प्रभाग क्र.१० मध्ये काही तरी थोडा फार विकास झालेला होता. परंतु गेल्या २० ते २५ वर्षापासुन प्रभाग क्र.१० मध्ये कुठलाही विकास झालेला नाही. मागील दिड वर्ष पहिले जेव्हा भाजप ची सत्ता आली त्यावेळेस थोडा फार निधी जसा विशेष निधी मधला असेल, दलित वस्ती अंतर्गत असेल,पुननिर्वाह असतील,उपयोजना मधले असतील अस काही प्रमाणात थोडा फार निधी त्या ठिकाणी आलेला आहे. परंतु प्रभाग क्र.१० याला लागुनच प्रभाग क्र.८ व थोडा उर्वरित भाग प्रभाग क्र.९ असा देखील आहे. परंतु विकासाच्या दृष्टीने या प्रभागात कुठल्याच प्रकारचा विकास झालेला नाही. तरी माझी आपणास सर्वांना विनंती आहे की, पुर्ननियोजन मधील हा दलित वस्ती सुधार योजनेचा निधी हा मला प्रभाग क्र.१० मध्ये मी दिलेला प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विषय क्र.७ या विषयाला अनुमोदन कोणाच आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विषय क्र.७ चे शिवसेनेचे मत काय ? रियाज भाई, याच काय सर्वानुमते आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो सर्वानुमते आहे.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ. विष्णु भाऊ. आदरणीय विष्णु भाऊ. सुनिल भाऊ. शिवसेनेचे मत. विष्णु भाऊ विषय क्र.७.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे. मंजुर मंजुर.

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणे साहेब, विष्णु भाऊंनी चार वेळा सांगितले मंजुर तरी तुम्ही तेच विचारत आहे.

**श्री.रियाज बागवान :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मंजुर मंजुर.

**श्री.रियाज बागवान :-** गोराणे साहेब पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, सन २०२०-२०२१ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त निधी किंवा पुर्ननियोजन मधील निधीतून प्रभाग क्रं.१० मधील खालील प्रस्तावित ०८ कामे करणेस व सदर कामे करणे कामी कामांचे समोर दर्शविलेल्या प्रमाणे येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१० पिंप्राळा गट नं.१७३ भैरव नगर येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ३२.५० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.१० पिंप्राळा मुंगळे शाळा खंडेराव नगर ते जी.प.कॉलनी पर्यंत आणि खंडेराव नगर ते मयूर कॉलनी जोड रस्त्याचे कॉंक्रीटकरण करणे. | ४० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.१० येथे खंडेराव नगर रेल्वे पूल ते हुडको दर्गा पर्यंत डांबरी रस्त्याचे काम करणे. | ६० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१० जी.प.कॉलनी ते हुडको दर्गा पर्यंत कॉंक्रीट गटारी तयार करणे. | ४० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.१०मध्ये तलाठी कार्यालय ते आशाबाबा रेल्वे बोगदा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४० लक्ष |
| ६ | प्रभाग क्र.१० मध्ये गट नं.२१९ मधील गौतम नगर बौध्द वसाहत मध्ये कॉंक्रीट पाथवे तयार करणे. | ३० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्रभाग क्र.१० पिंप्राळा गट नं.२००/१, २००/२, २००/३, १७४/अ, आनंदबन हौसिंग सोसायटी मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | ५० लक्ष |
| ८ | प्रभाग क्र.१० मध्ये जी.प.कॉलनी मध्ये कॉंक्रीट गटार व स्लॅप कल्व्हर्ट बांधणे. | ७.५० लक्ष |

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०  प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** व्यावसायीक व उदयोजकांना घरपट्टीकरामध्ये नियमानुसार सुट मिळणेबाबत श्री.दिपक प्रभाकर सुर्यवंशी व इतर १४ भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सन्मा.महापौर महोदया, आयुक्त साहेब आणि सभागृह या विषयासंदर्भात मला अशी सुचना करायची आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये मुळातच कराधान या प्रकरणामध्ये कलम ५६ नुसार जो काही व्यवसाय बंद असेल किंवा आपल्या मालमत्तेचा आपण वापर करणार नसुन आणि तशी मालमत्ता धारकाने सात दिवसाच्या आत आयुक्तांकडे लेखी सुचना केली असेल. तर त्यांना ते टॅक्स माफ करण्यात याव. तसा नियमच आहे कायद्यात तशी तरतुदच आहे. तशी कायद्यात प्रोव्हीजनच केलेली आहे. आता कोरोनाच्या पार्श्वभुमीवर लॉकडाऊन मध्ये प्रशासनाने किंवा राज्य शासनाने सुध्दा जेव्हा आदेश दिले होते आणि उद्योजकांचे किंवा व्यावसायीकांचे कामे जेव्हा बंद होते तेव्हा लॉकडाऊन पिरियेडसाठी कायद्यात असलेल्या तरतुदीचा आधार घेऊन त्यांना नियमानुसार घरपट्टीमध्ये सुट द्यावी. असा प्रस्ताव या ठिकाणी सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावास मान्यता द्यावी. बहुमताने नव्हे सर्वानुमते हा प्रस्ताव मंजुर करावा अशी आमची ईच्छा आहे. सर्व पक्षांनी याला मान्यता द्यावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, जो आपला हा ८ नंबरचा विषय आहे. मागील महासभेमध्ये सुध्दा आम्ही शिवसेने तर्फे उद्योजकांकरीता घरपट्टी माफ करणेबाबत आम्ही मुद्दा त्यावेळेस मांडलेला होता. त्याप्रमाणे आपण त्याला मंजुरी द्यावी. आम्ही शिवसेना त्या गोष्टीला सोबत आहोत.

**नगरसचिव :-** रियाज भाई, रियाज भाई

**श्री.कैलास सोनवणे :-** अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर साहेबा, यामध्ये सर्व गोष्टींची तपासणी प्रशासनाने करायची आहे की, लॉकडाऊन मध्ये जी व्यावसायीक प्राधीकरण अत्यावश्यक गोष्टी मध्ये येत असतील ते ही सुट मिळवु शकणार नाही. आणि येथे आपल्याला ही गोष्ट सुध्दा लक्षात घ्यायची आहे. मनपा मिळकतीचे जे गाळे आहे आणि गाळे धारकांनी जी गाळे भाडे यापुर्वीच भरलेले आहे. किंवा ३० ऑक्टोबर पर्यंत मागची संपुर्ण थकबाकी जमा करतील त्या गाळे धारकांना या सुटचा लाभ देण्यात यावा. ज्या भाडे धारकांकडे थकबाकी असेल त्यांना हे लाभ मिळणार नाही.प्रशासनाने या ठिकाणी याची नोंद घ्यायची आहे. आणि अंमलबजावणी करतांना प्रशासनाने या सर्व गोष्टींची खातीरजमा करायची आहे. उद्योजकांना आणि व्यावसायीक प्राधीकरणांना दोघीही गोष्टी यांना सुट देण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ अन्वये जी तरतुद आहे. त्या तरतुदीचा आधार घेऊन आता या तरतुदीवर प्रशासकीय अडचण अशी होती की, सात दिवसाच्या आत संबंधीत मालमत्ता धारकाने प्रशासनाला कळवायला पाहिजे. पण राज्य शासनाने जेव्हा आदेश दिलेले होते आणि ती प्राधिकरणे बंद होती. त्यामुळे त्या मालमत्ता धारकांने येथे कळविण्याची गरज नाही. आणि यासाठीच हा प्रस्ताव येथे आणण्यात आलेला आहे. या सगळया गोष्टींची प्रशासनाने खातरजमा करुन ज्या व्यावसायीकांसाठी कालावधीसाठी ते व्यावसायीक प्राधिकरण बंद होत. त्या कालावधीसाठी तेवढया कालावधीच कॅलक्युलेशन करुन कलम ५६ नुसार त्यांना सुट देण्यात यावी.

**नगरसचिव :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजुर.

**श्री.राजेंद्र पाटील :-** अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ सर्वानुमते मंजुर आहे का ?
**श्री.विष्णु भंगाळे :-** हो आमच अनुमोदन घ्या या विषयाला.
**श्री.राजेंद्र पाटील :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम मधील कलम ५६ च्या तरतुदीनुसार "जागा रिकामी अगर वापरात न राहिल्यामुळे मालमत्ता कराची रक्कम परत देणे" बाबत तरतुद आहे. त्या तरतुदीस अधीन राहुन केंद्र व राज्य शासनाचे आदेशान्वये कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सर्व उदयोग व व्यवसाय हे मार्च २०२० ते जुलै २०२० या काळात बंद होते. व्यावसायिक आस्थापना व उदयोग यांचा सदरील कालावधीत व्यावसायिक वापर झालेला नाही. त्यामुळे त्यांचे अतोनात असे आर्थिक नुकसान झालेले आहे. सबब त्यांना आकारणी करण्यात येत असलेल्या मालमत्ता करात सदरील उपरोक्त तरतुदीस नुसार सुट देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने अंमलबजावणी करतांना कोणती आस्थापने किती कालावधीसाठी बंद होती याची खातरजमा करुन त्यानुसार सुट दयावी.

तसेच महानगरपालिका मिळकतीचे गाळयांच्या बाबत सदर तरतुदीनुसार सुट देतांना ज्या गाळेधारकांनी ३० सप्टेंबर २०१९ पावेतोचे गाळेभाडे यापुर्वीच भरलेले आहे अगर जे गाळेधारक ३० ऑक्टोंबर २०२० पावेतो मागील संपुर्ण थकीत गाळेभाडे (३० सप्टेंबर २०१९ पावेतोचे) चा भरणा करतील त्यांनाच सदरील सुट लागु राहील याची नोंद घ्यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** शिवाजी नगर भागातील हमालवाडा परीसर व महाराष्ट्र दालमिल समोरील सार्वजनिक शौचालय पे ॲन्ड युझ तत्वावर देणेसाठी धोरण ठरविणे संबंधात सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, अध्यक्ष महोदया, आवाज येत आहे ना.
**मा.महापौर :-** बोला, बोला,
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पे ॲन्ड युझ तत्वावर देणेस मान्य आहे मी सुचक आहे.
**मा.महापौर :-** आवाज येत नाही. नवनाथ भाऊ.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पे ॲन्ड युझ तत्वावर देणेस मान्यता देण्यात येत आहे.
**मा.महापौर :-** ठिक आहे.
**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** विष्णु भाऊ सर्वानुमते मंजुर आहे का ?
**श्री.विष्णु भंगाळे :-** हो सर्वानुमते मंजुर.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स्वच्छ भारत अभियान व महापालिका फंडामधुन शिवाजी नगर भागातील हमालवाडा परीसरामध्ये नविन बांधुन तयार झालेले सार्वजनिक शौचालय पे ॲन्ड युझ तत्वावर देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** बाबासाहेब आंबेडकर मार्केट मधील एफ-८,९,१०,११ हॉल ३० वर्षे भाडेकराराने मिळणेबाबत श्री.योगेश आर. पाटील सचिव, जीवन विकास सामाजिक संस्था,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्रस्ताव मान्य आहे. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी ही विनंती.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** हा बोला ईबा भाई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, एका बाजुला आपण म्हणतात की, महापालिकेला २५ वर्षाच्या, ३० वर्षाच्या ५० वर्षाच्या कालावधीसाठी जागा देण्याचे अधिकार नाही. आणि हा प्रस्ताव ३० वर्ष मुदतीसाठी मागण्यात आलेला आहे. हा जो प्रस्ताव आहे ३० वर्षासाठी आहे.

**मा.महापौर :-** बरोबर आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मग प्रस्ताव कस काय मान्य करतात, आलाच कस काय हा ? जर आपण देऊ शकत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासन बघेल ते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा हो ना. प्रशासन एका बाजुला म्हणत आहे, ३० वर्ष देऊ शकत नाही.आम्हाला तुम्ही ९९ वर्षाचा दिलेल आहे. हा प्रस्ताव प्रशासनाकडुन येतो कस काय ?

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई, ३० वर्ष होऊन गेले तुमचे

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा ९९ वर्षाचा आहे तो. हा ३० वर्षाचा करार येतो कस काय ?

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचे ३० वर्ष झाले ना तुम्हाला बोलायचा अधिकार आहे का ? तुम्ही ३० वर्ष वापरायची ती जागा, आणि दुसऱ्यांवर बोट ठेवायच.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपणच सांगितल होत ना अप्पा.आपणच सांगितल ना की, देऊ शकत नाही ३० वर्ष म्हणजे कस.

**श्री.कैलास सोनवणे :-**ते प्रशासन पाहिन ते विखंडीत करीन प्रस्ताव.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आमच्याकडे पण प्रशासनाने पाहायला पाहिजे ना याच नजरेतुन.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठराव विखंडीत करेल प्रशासन, नियमानुसार करायला लाऊ.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ठिक आहे. आमचा विरोध नाही. नियमानुसार त्यांना ही करण्यात यावा आणि आम्हाला ही करण्यात यावा.

**मा.महापौर :-** ठिक आहे ईबाभाई, विरोध आहे का तुमचा ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विरोध नाही. पण नियमानुसार करा. आमच्यासाठी वेगळा न्याय आणि त्यांच्यासाठी वेगळा न्याय हे योग्य होणार नाही. आमची ही सहानभुतीपुर्वक विचार करण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर ताई, असे विषय प्रशासनाकडुन का येतात.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ, विष्णु भाऊ.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ आदरणीय विष्णु भाऊ, रियाज भाई.

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार करावे.

**नगरसचिव :-** नियमानुसार पण सर्वानुमते आहे का ? भुमिका काय आहे आपली ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आमच्या विरोधीपक्ष नेत्यांना विचारा.

**नगरसचिव :-** रियाज भाई, विष्णु भाऊ.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ. विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** बोला ताई,
**मा.महापौर :-** सर्वानुमते मंजुर का ?
**नगरसचिव :-** विष्णु भाऊ. आदरणीय विष्णु भाऊ.
**श्री.सुनिल महाजन :-** महापौर ताई, कश्या पध्दतीने आपण त्यांना मंजुरी देत आहे. रेडीरेकनर दराने की शासकीय दराने की, १ रुपया नाममात्र भाड्याने,
**मा.महापौर :-** विष्णु भाऊ.
**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, सुनिल भाऊ विचारत आहे की, हे आपण कोणत्या प्रकारे देत आहोत. रेडीरेकनरने देत आहोत की, कश्या प्रकारे देत आहोत.
**श्री.कैलास सोनवणे :-** विष्णु भाऊ, नियमानुसार प्रशासन अंमलबजावणी करेल नाही तर ठराव विखंडनाला पाठवेल.
**श्री.विष्णु भंगाळे :-** ओके, ठिक आहे.
**नगरसचिव :-** सर्वानुमते आहे ना विष्णु भाऊ.
**श्री.विष्णु भंगाळे :-** हो सर्वानुमते आहे.
**नगरसचिव :-** रियाज भाई, सर्वानुमते आहे का ?
**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार सर्वानुमते आहे.
**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब असे प्रस्ताव प्रशासनाकडुन मागत चला जे आर्थिक विषय असता ते.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जीवन विकास सामाजिक संस्था,जळगांव या संस्थे मार्फत विविध शैक्षणिक योजना, शाळा, महाविदयालय चालवले जातात. या संस्थेच्या कार्यालयीन कामकाज व योजनेसाठी बाबासाहेब आंबेडकर मार्केट मधील एफ-८,९,१०,११ हॉल ३० वर्षे भाडेकराराने देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र जळगांव शहर महानगरपालिकेच्या सर्व नियम व अटी-शर्तीस बांधिल राहून तसेच हॉलची देखभाल, दुरुस्ती व इतर देखरेख करणेची जबाबदारी ही जीवन विकास सामाजिक संस्था,जळगांव या संस्थेचे राहील.
प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** जळगांव शहर मनपा हद्दीतील गट नं.२९२/२९३ मधील खुली जागा विकसीत करणे कामी यश लॉन मित्र मंडळ,जळगांव यांना देणेबाबत ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा, सभापती, स्थायी समिति यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**सौ.शुचिता हाडा :-** प्रस्ताव मान्य आहे.
**श्रीमती लता भोईटे :-** अनुमोदन आहे.
**श्री.सुनिल महाजन :-** साहेब विषय क्रं. १० ते १३ मंजुर आहेत.
**नगरसचिव :-** सुनिल भाऊ सर्वानुमते मंजुर आहे का ?
**श्री.सुनिल महाजन :-** हो सर्वानुमते मंजुर आहे.
**नगरसचिव :-** ठिक आहे. रियाज भाई सर्वानुमते मंजुर आहे का ?
**श्री. रियाज बागवान :-** सर्वानुमते आहे परंतू नियमानुसार द्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, यश लॉन मित्र मंडळ,जळगांव यांचे दि.१२/०३/२०२० चे पत्रात नमुद केल्या प्रमाणे जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील गट नं.२९२/२९३ मधील खुल्या जागेत छोटासा बगीचा,

फिरण्यासाठी ट्रॅक, फुले झाडे, लहान मुलांसाठी खेळण्याचे साहित्य तसेच नागरिकांसाठी व्यायाम करणे कामी व्यायामाचे साहित्य, जेष्ठ नागरीक, महिला, मुले यांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी जळगांव शहर मनपा हद्दीतील गट नं.२९२/२९३ मधील खुली जागा यश लॉन मित्र मंडळ,जळगांव यांना स्व:खर्चाने विकसीत करणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिले नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड.हॉडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- भोईटे लता रणजीत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** जळगांव शहर मनपा हद्दीतील वाघ नगर शिवारातील सर्व्हे नं.१५८, १२३/४, १९९, ९३ या पैकी कोणताही एक खुला भुखंड सुर्य जिवनी बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना देणेबाबत ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा, सभापती, स्थायी समिती यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.शुचिता हाडा :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, सुर्य जिवनी बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांचे पत्रात नमूद केलेनूसार सदर संस्था ही सर्व जातीच्या धर्माच्या मुलांसाठी उपक्रम राबवत असते. तसेच संस्थेच्या वाचनालया तर्फे सर्व स्पर्धा परीक्षा साठी लागणारे पुस्तके मुलांना घरी वाचन करणेसाठी दिली जातात तसेच संस्थे मार्फत मुलांकरिता अभ्यासिकेची सोय करण्यात आली असून त्याठिकाणी ५० गरीब मुलांची अभ्यासाची सोय करण्यात आली आहे. संस्थेस असेच कार्य यापूढे करण्यासाठी जळगांव शहर मनपा हद्दीतील वाघ नगर शिवारातील सर्व्हे नं.१५८, १२३/४, १९९, ९३ या ऐवजी पिंप्राळा शिवारातील सर्वे नं.१५४/२ खुला भुखंड सुर्य जिवनी बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिले नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड.हॉडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- कोल्हे ललित विजय**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** मेहरुण शिवार मनपा खुला भुखंड गट क्रमांक १८१/२ अ सामाजिक, जनहिताची व बालसंस्कार, खुवा संस्कार केंद्रासाठी विकसित करणेकामी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपिठ त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक यांच्या वांजोळा शाखेला देणेबाबत सन्मा.सदस्या सौ.जिजाबाई आण्णासाहेब भापसे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** अनुमोदन आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, माझी एक सुचना आहे.

**मा.महापौर :-** बोला ताई.

**सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.१२ मधील जी जागा आहे. ती अर्धी जरी असली तरी पिंप्राळा शिवारातील सर्व्हे नं. १५४/२ ही संस्थेसाठी या जागेचा ठराव करण्यात यावा व याची नोंद घ्यावी.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ, सुनिल भाऊ.

**श्री.सुनिल महाजन :-** सर्वानुमते मंजुर.

**नगरसचिव :-** रियाज भाई

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर मंजुर

**श्री.विष्णु भंगाळे :-** नियमाला अधिन राहुन सर्वानुमते मंजुर करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मेहरुण शिवार मनपा खुला भुखंड गट क्रमांक १८१/२ अ ही जागा सदयस्थितीत या परिसरातील नागरीकांना या जागेचा उपयोग होत नसून पडीत आहे. सदर जागेवर अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपिठ त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक यांच्या वांजोळा शाखेने सामाजिक, जनहिताची व बालसंस्कार, युवा संस्कार केंद्र विकसित करणेसाठी मागणी केलेली आहे.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपिठ त्र्यंबकेश्वर शाखेतर्फे पुर्ण देशभरात विविध सामाजिक, जनहित, बालसंस्कार केंद्र, युवा संस्कार केंद्र यासम अनेक उपक्रम राबवित असतात तसेच मेहरुण शिवार मनपा खुला भुखंड गट क्रमांक १८१/२ अ ही जागा सदयास्थितीत उपयोगहीन असून सदर जागा सामाजिक, जनहिताची व बालसंस्कार, युवा संस्कारासाठी विकसित करणे कामी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपिठ त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक यांच्या वांजोळा शाखेला देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिले नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- १)** शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती करणेकामी सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व इतर ४ सदस्यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर व रक्कम रु.२९६७७०५०/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** किती कोटीचे होत आहे अप्पा सर्वे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते ४० कोटीच्या वरती आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आप्पासाहेब मग दुसरी यादी कुठे आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** महापौर साहेबा यांनी दुसरी एक यादी दिलेली आहे काही नगरसेवकांचे पत्र आले होते म्हणुन जे रस्ते सुटले होते ते प्रस्तावीत केलेले आहे परत.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब .

**श्री.रियाज बागवान :-** अप्पा साहेब दुसरी यादी नही मिली एक ही यादी है.

**श्री.सुनिल महाजन :-** वाढीव कोण कोणते घेतलेले आहे त्यांच वाचन करुन दाखवा.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर साहेब,

**मा.महापौर :-** बोला बोला.

**श्री.रियाज बागवान :-** फक्त ५४ रस्त्यांची यादी आलेली आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया,

**श्री.सुनिल महाजन :-** २४ रस्त्यांचे कामांची यादी नाही आमच्याकडे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,
मग आम्हाला यादी का देण्यात आलेली नाही.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई ५४ कामांची यादी आली आहे फक्त आमच्याकडे

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया २४ कोटींच्या कामाच्या यादया ज्या आहेत याच्यामध्ये ५ नं वॉर्डामधील काम घेतलेले नाहीत असं म्हंटलेल होत त्याप्रमाणे दुसरं भिलपुरा पोलिस चौकी ते ममुराबाद पुल आणि दधिची चौक ते नेरी नाका हे दोघेही काम प्रभागाच्या सिमेवर आहेत. आमच्या प्रभागाला याच्यात कुठेही न्याय दिलेला नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** विरोधकांच्या वॉर्डाची कामांची यादी घेण्यात आलेली नाहीये.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया बरोबर आहे आमच्या वॉर्डाच्या रस्त्यांची कामाची या यादी मध्ये घेतलेली आहेत अर्धी आमच्या प्रभाग क्र.४ वाल्याची आणि अर्धी प्रभाग क्र.६ वाल्याची. कश्या परिस्थितीत आम्हाला न्याय देण्याचा प्रयत्न करत आहात आपण.

**श्री.चेतन सनकत :-** विष्णू भाऊ ममुराबाद रोड हा गावाला जोडणारा प्रमुख रस्ता आहे. चोपडा शिरपुर या गावाकडे जाणारा मुख्य रस्ता आहे म्हणून तो घेतला आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय आमच्या प्रभागाचा काहीच विचार करण्यात आलेला नाहीये .

**श्री. कैलास सोनवणे :-** विष्णू भाऊ ऐकुन घ्या. मी काय म्हणतोय की जो रस्ता घेतलेला आहे आपण येथे.

**ॲड . हाडा शुचिता :-** आवाज येत नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे :-** हॅलो येतोय का आवाज आता

**मा.महापौर :-** हो बोला आप्पासाहेब ,

**श्री. कैलास सोनवणे :-** विष्णू भाऊ नितीन भाऊंशी पण बोलणे झाले आहे व स्पेशल सांगीतले आहे त्यांना आणि हा भिलपुरा ते ममुराबादचा जो रस्ता घेतलेला आहे तो पण सांगीतला आहे विष्णू भाऊ आणि शनिमंदिर जवळच्या सर्व गल्ल्या देखील याच्यात आलेल्या आहे विष्णु भाऊ. जळगांव शहरातील असे रस्ते घेतलेले आहे जेथे खुप खड्डे पडलेले आहे. जर तुमच समाधान नाही झाल तर आपण ठराव विखंडीत करुन टाकु. याचा तुम्ही विचार करु नका.

**श्री नितीन बरडे :-** आप्पा मी काय म्हणतोय . हे कामे होतील का ?

**श्री. रियाज बागवान :-** महापौर साहेब आमच्या वॉर्डातील रस्ता काशिनाथ चौक ते शेरा चौक चा रस्ता आहे आम्ही किती दिवसांपासुन सांगतोय हा रस्ता करा कारण या रस्त्यावर खड्डे ईतके जास्त आहे की सांगु की चालायला पण जागा राहात नाही.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आप्पासाहेब

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा मी काय म्हणतोय.

**श्री. कैलास सोनवणे :-** विष्णु भाऊ संपुर्ण यादी पाहुन घ्या तुम्ही. संपुर्ण यादी वाचायला लावा.

**श्री . ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई , वाचुन दाखवा .

**नगरसचिव :-** याच्यातील यादी प्रस्ताव जो आहे. यात ५४ कामांचे नांव आलेले आहेत. त्यानंतर मा.महापौर महोदया यांनी २४ कामांची यादी यामध्ये समाविष्ठ करणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत त्यानुसार मी २४ कामांची नावे वाचुन दाखवतो.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१ शिवाजी नगर धनाजी काळे नगर ते आव्हाणे रोडपर्यंतचा २४ मी रुंद रस्ता. | ८७००००००.०० |
| २. | प्र.क्र.६ बाबा हरदासराम मंगल कार्यालय ते आंबेडकर नगर पर्यंतचा रस्ता व बीएसएनएल क्वार्टर पर्यंत. | ८१२९०००.०० |
| ३. | प्र.क्र.७ रिंगरोड हनुमान मंदीर ते चंद्रप्रभात कॉलनी पर्यंत रस्ता. | ३६५८०००.०० |

| | | |
|---|---|---|
| ४. | प्र.क्र.७ युनिटी चेंबर ते प्रभुदेसाई कॉलनी पर्यंत रस्ता. | ५४२००००.०० |
| ५. | प्र.क्र.११ कोल्हे नगर १०० फुट रोड ते गिरणा पंपींग रोड पर्यंत १०० फुटी रिंगरोड | २३१९५५००.०० |
| ६. | प्र.क्र.१५ औरंगाबाद रोड हॉटेल कस्तुरी ते मेहरुण बुरुजा पर्यंत रस्ता. | १०६२९१०८.०० |
| ७. | प्र.क्र.११ रामानंद नगर पोलीस स्टेशन ते विदयुत कॉलनीमार्गे हायवे पर्यंत. | ३७९४०००.०० |
| ८. | प्र.क्र.०६ रुख्मा टेन्ट हाऊस ते नानीबाई अग्रवाल हॉस्पीटल कडील रस्ता | ४०६४०००.०० |
| ९. | प्र.क्र.१७ पांझरा पोळ चौक ते राजाराम मंगल कार्यालयपर्यंतचा डांबरी रस्ता | ३५००००००.०० |
| १०. | प्र.क्र.१७ आयोध्या नगर स.क्र.१४१ बगीचा ते जुनी जिन पर्यंत. | ३७००००००.०० |
| ११. | प्र.क्र.११ वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर पुलापर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ७७५२०००.०० |
| १२. | प्र.क्र.१० खंडेराव नगर ते हुडको पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ३१००८००.०० |
| १३. | प्र.क्र.१३ एकलव्य जिम (एम.जे.कॉलेज) ते शिव कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ७७५२०००.०० |
| १४. | प्र.क्र.११ दत्त डिगंबर हौ.सोसा. ते गिरणा पंपींग पर्यंतचा ३० मिटर रुंद रस्ता डांबरीकरण करणे. | ३५८५३००.०० |
| १५. | प्र.क्र.१७ काशिनाथ हॉटेल,गृहकुल कॉलनी ते पंढरपूर नगर पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे (म्हाडा कॉलनी ते पंढरपूर नगर) | १०२५००००.०० |
| १६. | प्र.क्र.०४ शनिपेठ पोलिस चौकी ते ओक मंगल कार्यालया पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | १९००००००.०० |
| १७. | प्र.क्र.४ भिलपूरा पोलिस चौकी ते ममुराबाद रेल्वे पूला पर्यंतच्या रस्त्याला जोडणारे पुर्व पश्चिम ५ रस्ते डांबरी करण करणे. (डावी बाजूकडील) | २५००००००.०० |
| १८. | प्र.क्र.२ कालंका माता मंदीर ते रेल्वे लाईन व अनिल प्रोव्हीजन ते सोपान कोळी यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | २५००००००.०० |
| १९. | प्र.क्र.३ सुनंदीनी पार्क ते काशिनाथ नगर पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ४७७४२५४.०० |
| २०. | प्र.क्र.०३ गोपाळपुरा ते हरीओम नगर जुना आसोदा रस्ता करणे | ८९९८२९०.०० |
| २१. | प्र.क्र.०३ गोपाळपुरा ते खेडी मधील खडके शाळेपर्यंत जुना खेडी रस्ता करणे | ११३८४५५०.०० |
| २२. | प्र.क्र.३ खेडी ते नॅशनल हायवे ते तलाठी कार्यालय रस्ता करणे | २२७६९१०.०० |
| २३. | प्र.क्र.०३ कालिंका माता मंदिर ते जुना खेडी रोड (रिंगरोड) करणे | ३७९४८५०.०० |
| २४. | प्र.क्र.७ पिंप्राळा ग.क्र.८७ आर.एम.एस.कॉलनी मागील भागाचा रस्ता तयार करणे. | १६८००००.०० |

**श्री.सुनिल महाजन :-** गोराणे साहेब त्याच्या मध्ये एक चुकीची दुरुस्ती करतो मी.

**श्री.रियाज बागवान :-** अप्पा साहेब प्रभाग क्र.१८ चा कोणताही रस्ता नाही.

**श्री .कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब आम्ही वाचुन घेवु ते रस्ते .

**श्री.विष्णू भंगाळे :-** आप्पा वाचू द्याना.

**नगरसचिव :-** यादीतील अ.क्रं. १ ते २४ अश्या २४ रस्त्यांची यादी मा.महापौर यांनी समाविष्ट करणेबाबत दिलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर मॅडम . . .

**नगरसचिव :-** बोला भाऊ बोला .

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया आवाज येत नाहीये मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ तुमचा आवाज येतोय बोला.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया हि जी यादी वाचुन दाखविलेली आहे याच्यामध्ये आमच्या ५ नंबर वॉर्डाची काही रस्त्यांची कामे घेतली गेली आहेत का ?

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ तुमचा आवाज येत नाही बोला .

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया ,

**श्री. रियाज बागवान :-** महापौर ताई मुझे बोलना है.

**मा.महापौर :-** बोला रियाज भाऊ

**श्री. रियाज बागवान :-** महापौर ताई मुझे बोलना है.

**मा.महापौर :-** बोलाना रियाज भाऊ.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई आता आपण जे घेतलेले आहे त्याच्यामध्ये आझाद नगरचा रोड घेतलेला नाहीये

**श्री. रियाज बागवान :-** महापौर ताई मुझे बोलना है.

**मा.महापौर :-** बोलाना रियाज भाऊ

**श्री. रियाज बागवान :-** महापौर ताई मुझे बोलना है एकही मिनिट बोलना है.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** रियाज भाई प्रभाग क्र.१८ चा घेतलेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** काशिनाथ ते अशोक किराणा घेतलेला आहे.

**श्री.रियाज बागवान :-** काशिनाथ ते अशोक किराणा घेतलेला आहे पण या २४ रस्त्यांमध्ये घेतलेला नाही. महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** सर्वांनी आधी आपले माईक बंद करावे आवाज व्यवस्थित येत नाहीये. कोणी कोणी माईक चालु ठेवलेले आहेत त्यांनी आपआपले माईक बंद करावेत.

**श्री. रियाज बागवान :-** महापौर ताई मुझे बोलना है.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ बोला , नितीन भाऊ

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई विष्णू भाऊंना बोलु द्या ताई.

**मा.महापौर :-** विष्णूभाऊ बोला .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई

**श्री.विष्णू भंगाळे :-** मी बोलतोय ना भाऊ

**मा.महापौर :-** विष्णूभाऊ बोला आवाज येत नाहीये तुमचा, विष्णूभाऊ बोला आवाज येत नाहीये तुमचा.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आता हा टेन्किकल प्रॉब्लेम आलेला आहे , महापौर महोदया याच्यामध्ये पहिली यादी असेल दुसरी यादी असेल ती आता आपण जी वाचुन दाखवली त्यामध्ये प्रभाग क्रं. ५ मधील दोन रस्ते ममुराबादचा रोड असेल किंवा गफ्फार भाई यांच्या घराजवळील असेल या व्यतिरिक्त आमच्या प्रभाग क्रं. ५ मध्ये रोड समाविष्ट नाहीत आणि याच्यामध्ये प्रभाग क्रं. ५ चे रोड आहेत हे रोड प्रभाग क्र. ४ व ५ चे कॉमन असलेले रोड घेतलेले आहेत म्हणजे तिकडुन सनकत आहे. इकडुन प्रभाग क्र.६ आहे. अश्या प्रकारे ही कामे घेतलेली आहे. तरी विनंती आहे की, आपल्याला प्रभाग क्र. ५ ला सुध्दा न्याय दयावा आणि आमच्या प्रभागातील रस्त्यांचा समावेश करण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम मला बोलायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** बोला आप्पासाहेब .

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब .

**श्री.रियाज बागवान :-** महापौर मॅडम मुझे बोलना है.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा तुम्ही बोलुन घ्या पहिले मग आम्हाला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हॅलो, हॅलो.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनिल भाऊ एकच मिनीट, मला बोलुन घेऊ द्या.

**श्री.नितीन बरडे :-** हो बोला आप्पासाहेब .

**श्री.कैलास सोनवणे :-** आपण जे रोड याच्यामध्ये घेतलेले आहे ऐकून घ्या विष्णू भाऊ आपण ज्या रस्त्यांचे काम घेतलेले आहेत. ते कोणाचे ही चेहरे पाहुन घेतलेले नाहीयेत किंवा कुणाचेही नावे पाहुन घेतलेले नाहीयेत किंवा पक्षाचे घेतलेले नाहीयेत यात आपल्याला जे प्रमुख रस्ते करायचे आहेत. आता याच्यामध्ये जे चांगले रस्ते असतील त्या रस्त्यांचे फक्त खड्डे बुजविले जातील याच्यामध्ये आपण असं करणार आहे आणि ज्या ठिकाणी नविन रस्त्याला पर्यायच नाही असे रस्ते करू आम्ही नितीनभाऊंशी सुध्दा चर्चा केली आणि तुमचा प्रभाग क्रं. ५ मधील सर्वच गल्ल्या झालेल्या आहे. त्यानंतर गफ्फार भाई च्या पासुन ते ममुराबादरोड पर्यंतचा रस्ता झालेला आहे. त्याचा रिपोर्ट सुध्दा झालेली आहे. त्यानंतर जे आपण ५ कोटीचे कामे घेतलेली आहे त्याच्यामध्ये सर्व प्रमुख रस्ते तुमच्या भागातले जवळ जवळ जे मुख्य रस्ते तुमच्या भागातले आहे. नविपेठचा ऐरिया असेल, टॉवर पासुन तर ते पुढच्या यादीमध्ये आहे आणि सुनिल भाऊंनी जे सांगीतले सुनिल भाऊ याच्यामधले ही बरेच रस्ते घेतलेले आहेत. तर रियाजभाऊ जे बोलले तर माझ्या मते शेराचौकचा एक रस्ता घेतलेला आहे आणि महाबळ चा रस्ता तो जो काशिनाथ चौक आहे ना तो पण घेतलेला आहे.

**श्री.रियाज बागवान :-** आप्पा शेरा चौकाचा जो रोड आहे तो काशिनाथ पासुन अशोक किराणा पर्यंत घेण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा ठिक है ईबाभाई, विष्णू भाऊ याच्या मध्ये जर आपला समाधान होत नसेल तर आपण सर्व बसु आणि पुन्हा यादी सादर करु. शहर आपले आहे सर्वांनी मिळुन शहराचा विकास करायचा आहे. तुमचे वार्ड जर सोडले तर शहराचा विकास कसा म्हटला जाईन.

**श्री.विष्णु भंगाळे :-** शहराचा विकास होत नाही. महानगरपालिका करत नाही ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता तुमच्या १५ वार्डांसाठी तर आणले नाही. खोट वाटत असेल तर यादी पाहुन घ्या.

**श्री. रियाज बागवान :-** आप्पासाहेब मेरोको बोलाना है.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला ना तुम्ही, महापौरांची परवानगी घ्या आणि बोला, चिंता करु नका. सर्वांचे कामे होतील.

**श्री. रियाज बागवान :-** महापौर मॅडम मुझे बोलना है. सिर्फ एक मिनीट.

**मा.महापौर :-** बोलो रियाजभाई

**श्री. रियाज बागवान :-**एक रास्ता मेरी तर्फ का लिया है. काशिनाथ ते शेरा चौक का रास्ता. इसके अलावा मेरे वॉर्ड मे और भी बहोत रास्ते है जो खराब है. अभी शेरा चौक से दत्ता नगर जो रास्ता जाता है. चौधरी गल्ली बोला जाता है खराब है. उसके बाद संतोषी माता मंदिर से मदरसा रोड का रास्ता भी बहोत खराब है. उसके बाद मदिना अपार्टमेंट से अक्सा मस्जिद के पास जानेवाला रास्ता है वो भी खराब है. ये प्रमुख रस्ते है खराब है.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अमृत के नल जोडने बाकी है अपने प्रभाग मे. उसके बाद ये रस्ते होंगे.

**मा.महापौर :-** रियाजभाई पुढच्या महासभेत घेवु आपण जे रस्ते राहिलेले आहे.

**श्री. रियाज बागवान :-** चालेल , चालेल मॅडम

**श्री.कैलास सोनवणे :-** रियाज भाई. रियाज भाई

**श्री.रियाज बागवान :-** हा अप्पा. आवाज नही आ रहा तुम्हारा.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर ताई.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ बरडे बोलाना.

**श्री. कैलास सोनवणे :-** रियाज भाई आपका एक ही रोड ६७ लाख का है.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** रोड घेतल्यावर, आभारी आहे तुमच अप्पा साहेब.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब याच्यामध्ये ४२ कोटीचे जे काम असतील ते घेतले असतील ते हॅलो या रस्त्याचे प्रस्तावांचे ईस्टिमेट परफेक्ट आहे का? आणि हे रस्ते कोणत्या निधीतुन होणार आहे. महापौर ताई आले का लक्षात.

**मा.महापौर :-** हो नितीनभाऊ

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ , अहो नितीनभाऊ ते मनपा फंडातुन होणार आहे आणि १०० टक्के ते होणार आहे त्या रस्त्यां बद्दल कोणी चिंता करायची नाही. महापौर ही भारतीय जनता पक्षाचा राहिल सभापती ही भारतीय जनता पक्षाचा राहील आणि १०० टक्के ते कामे होतील. तुम्ही चिंता नाही करायची होतील काये.

**श्री.सुनिल महाजन :-** स्थायी समितीचा सभापती तुमचाच राहणार आहे. आणि महापौर पण तुमचाच आहे. हे काय नविन सांगत आहे का तुम्ही. याच्यात काय नविन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनिल भाऊ मी याच्यासाठी सांगत आहे. की, आम्ही असो किंवा नसो.महापौर पुढचा ही जो राहील.तेव्हा होईल.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा आता बहुमत तर भाजपचेच आहे ना. काय नविन सांगत आहे तुम्ही, स्थायी समिती सभापती पण भाजपचाच राहणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे महापौर राहो किंवा नाही हे कामे होणार.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा सुनिल भाऊ १ मिनिट , विष्णू भाऊ १ मिनिटं कैलास आप्पा

**श्री.सुनिल महाजन :-** मला पण बोलायचे आहे. मी केव्हाची वाट पाहत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा साहेब हे जे रस्त्यांचे ईस्टिमेट आहे पुर्ण केलेले आहे का? की बदलणार आहे अजुन आणि हे रस्ते किती महिन्यात होतील ६ महिने कि वर्षभर .

**श्री.कैलास सोनवणे :-** हे पहा नितीन भाऊ त्याच्या मध्ये काही अडचणी आहेत.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौर ताई. महापौर ताई.

**मा.महापौर :-** बोला ताई.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई, या यादीत अ.क्र. ८ वर एक रस्ता नमुद केलेला आहे. रुख्माबाई टेन्ट हाऊस ते नानीबाई अग्रवाल हॉस्पीटलचा रस्ता.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती ताई मला बोलुन घेऊ द्या.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौर ताईनी मला परवानगी दिलेली आहे नितीन भाऊ. एकच वाक्य आहे. माझ होऊन जाऊ द्या तेवढ.या वाढीव यादी मध्ये अ.क्र.८ वर रुख्माबाई टेन्ट हाऊस ते नानीबाई अग्रवाल हॉस्पीटलचा रस्ता अस नमुद केलेला आहे. प्रभाग क्र.६ मधील तर हा आदीच्या यादीमध्ये सुध्दा अ.क्र.५४ वर नमुद आहे. प्रभाग क्र.६ सुपारी कारखाना ते रुख्मा टेन्ट हाऊस पर्यंचा रस्ता.येथे फक्त नोंद घ्याची आहे प्रशासनाने की, आदीच्या यादीमध्ये हा रस्ता नमुद असल्यामुळे नविन यादी मध्ये अ.क्र.८ ला प्रभाग क्र.६ चा दुसरा रस्ता घेण्यात यावा ही रक्कम प्रभाग क्र.६ साठी खर्ची पडेल फक्त हे काम रिपीट होत आहे तर हे रिपीट होऊ नये. आम्ही जे दुसरा रस्ता सुचवु त्याचा त्यात समावेश करण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** सर्व सदस्यांना विनंती आहे की, ज्या काही दुरूस्त्या असतील सभा संपल्यावर कळवायच्या आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** प्रशासनाने याची नोंद घ्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर ताई एक दुरुस्ती आहे अजुन कस्तुरी हॉटेल ते मेहरूण हा मुख्य रस्ता आहे याला डांबरीकरण करण्याच्या कामात प्रभाग क्र.१५ दिलेला आहे ते प्रभाग क्र.१४ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बर ज्या काही दुरूस्त्या असतील ना सर्वांनी सभा संपल्यानंतर गोराणे साहेबांना कळवायच्या आहे. त्या दुरूस्त्या करून घेवु.

**मा.महापौर :-** नगरसचिव साहेब, सन्मा.नगरसेवक, विरोधीपक्ष नेते, गटनेते यांची आता सभागृहात झालेली चर्चा व त्यांचे मागणीनुसार २४ कामांचे यादी मध्ये काही दुरूस्त्या आहेत त्या करण्यात याव्या. व चर्चेप्रमाणे याव्यतिरिक्त अजुन ८-१० रस्त्यांची कामे यादीत समाविष्ट करण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला नितीनभाऊ

**श्री.नितीन बरडे :-** आप्पासाहेब हे किती महिन्यात कामे होतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी सांगीतले ना तुम्हाला सर्व ऐकुन घ्या याच्यामध्ये आपण सर्वजण शांततेमध्ये बसुन याच्या मध्ये चार अडचणी होत्या प्रामुख्यानेशासनाकडून मंजुरी नव्हती आता ती मंजुरी काल आलेली आहे.कारण आपल म्हणणे होते की, स्वनिधीची मध्ये परवानगी मिळावी. दोन पत्र पाठविल्यानंतर ती मंजुरी काल आली तर ती एक अडचण दुर झालेली आहे. त्यानंतर ज्या भागात भुयारी गटारी आहेत, ज्या भागात अमृत तर सगळीकडे आहेच अमृत योजनेचे आणि भुयारी गटारींचे काम झाल्यानंतर म्हणजे आपण या रस्त्यांची यादी गटारींच्या भुयारी गटारचे ठेकेदाराकडे आणि अमृतच्या ठेकेदाराकडे आयुक्तांच्या मार्फत पाठविणार आहे आणि त्या भागांना प्रायोरीटी देवुन आणि ते संपल्यानतर तो पर्यंत आपल्याकडचे मार्केट चे पैसे आणि आता जे आपल्याकडे शिल्लक आहेत त्या मधुन हे रस्ते होणार आहे आणि ते १०० टक्के करू . भुयारी गटार वाल्याचा काही प्रॉब्लेम नाही. राहिला विषय अमृत योजनाचे अमृतच्या तर तुम्ही तुमच्या याच्यावर अमृतच्या ठेकेदाराला सांगा आणि आम्ही तर सांगतोच आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पासाहेब अमृतच्या ठेकेदाराच्या नावाने आपण जी ओरड करत आहे. त्यांना प्रशासनाकडुन भरपुर अडचणी आलेल्या आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो माहित आहे आम्हाला, मान्य आहे , मान्य आहे

**श्री.सुनिल महाजन :-** त्यांना भरपुर अडचणी आल्यामुळे अमृतचे काम पडलेले होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** फक्त प्रशासनाच्या अडचणीमुळे काम थांबलेले नाही.

**श्री.भागचंद जैन :-** अप्पा सांगा ना तुम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय सांगा, आपले दुर्देव्य होईल ते की, पैसे रेडी असतांना मुदत संपुन गेली आणि काम होत नाही.

**मा.महापौर :-** शुचितात‍ाई हाडा, शुचितात‍ाई हाडा.

**श्री.भागचंद जैन :-** अप्पा एम.जी.पी.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो, एम.जी.पी.ची अडचणी होत्या ते मी पेपर मध्ये प्रेसनोट मध्ये दिलेले आहे.

**श्री.भागचंद जैन :-** अप्पा दुर्देव तर होणार नाही. काही अडचणी असल्यावरच काम होत नसते.

**श्री.कैलास सोनवणे :-** अमर भाऊ माझा शब्द परत ऐकुन घ्या. जर पैसे रेडी असल्यावर ही कामे अपुर्ण राहिले. तर आपले दुरदैव्य आहे.आणि अमृतमुळे घाण नाही झाली का जळगांव शहराची.

**मा.महापौर :-** सुचक अनुमोदक कोण आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा साहेब, अमृतचे काम होईल आणि लवकरच होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाले तर चांगलेच आहे ना.

**श्री.सुनिल महाजन :-** आपल्या गावाचा माणुस काम करत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** करु द्या ना चांगल आहे काम.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा साहेब, अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला बोला.

**मा.महापौर :-** सुचक अनुमोदक.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा साहेब, अप्पा साहेब.

**मा.महापौर :-** बरडे भाऊ बोला.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर ताई, माझ्या वार्डातले कोणते काम आहे.

**मा.महापौर :-** पुढच्या सभेला घेऊ बाकीचे विषय.

**श्री.नितीन बरडे :-** एकच मिनीट महापौर साहेब, माझ्या वार्डातील ६ कामे आहे.

**मा.महापौर :-** पुढच्या सभेला घेऊ बाकीचे काम.

**श्री.नितीन बरडे :-** ज्या वेळेला माझ्या वार्डाच्या कामांच्या उदघाटनाला तुम्ही सर्व नगरसेवक याल तेव्हा सर्वांना माझ्याकडुन ओंकार लॉनला जेवण राहीन.

**मा.महापौर :-** ठिक आहे. सुचक अनुमोदक कोण आहे सांगा.

**नगरसचिव :-** ज्यादा विषयांची सुचना विषय क्र.१ सुचक अनुमोदक कोण आहे.

**श्री.चेतन सनकत:-** सदर विषयास मी सुचक आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे सदरचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिलभाऊ सर्वानुमते मंजुर आहे का ?

**मा.महापौर :-** सुनिलभाऊ बोला

**श्री.सुनिल महाजन :-** हो सर्वानुमते आहे.

**नगरसचिव :-** रियाजभाई सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो सर्वानुमते आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विकासाच्या कामाला शिवसेनेचा सदैव पाठींबा राहिल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील रस्ते फारच खराब झालेले असून गेल्या काही वर्षापासून शहरात नवीन रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेली नसल्याने खालील नमूद अ.क्र.१ ते ५४ कामांच्या यादी प्रस्तावात काही दुरुस्त्या करण्या संदर्भात मा.महापौर यांनी महासभेत निर्देश दिल्याप्रमाणे दुरुस्त्या करुन सदर ५४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२९६७७७०५०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने सदर रस्त्यांवर अमृत पाणी पुरवठा व अंडरग्राऊंड ड्रेनेजची कामे पुर्ण झालेनंतरच सदर कामांचे कार्यादेश देण्या बाबतची पूढील कार्यवाही करावी.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१ मनपा शाळा क्र.०१ ते दुध फेडरेशन पर्यंतचा रस्ता करणे. | १०११९६००/- |
| २. | प्र.क्र.१ खडकेचाळ ते दुध फेडरेशन पर्यंतचा रस्ता करणे. | १६६६३५००/- |
| ३. | प्र.क्र.१ दुध फेडरेशन रोड ते सब स्टेशन ते सि.टी.कॉलनी पर्यंतचा रस्ता करणे. | ७५८९७००/- |
| ४. | प्र.क्र.१ कानळदा रोड लाकुड पेठ ते क्षेत्रीय मराठा कार्यालय ते काळे नगर श्री.राहुल तिवारी यांच्या घरापर्यंतचा रस्ता करणे. | २८४६१३८/- |
| ५. | प्र.क्र.२ ममुराबाद जुना जकात नाका ते स्वामी समर्थ केंद्र ते असोदा रोड पर्यंतचा रस्ता करणे. | ३१८७६७४/- |
| ६. | प्र.क्र.२ असोदा रोड घरकुल ते प्रशांत चौक ते रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता करणे. | ४५०३२२२/- |
| ७. | प्र.क्र.५ नवीपेठ पत्री हनुमान मंदीर ते ममुराबाद रोड पर्यंतचा रस्ता करणे. | ३१६२३७५/- |
| ८. | प्र.क्र.४ दधीची चौक ते नेरी नाका (पांझरापोळ टाकी) रस्ता करणे. | ४७४३५६३/- |
| ९. | प्र.क्र.४,५ भिलपूरा पोलिस चौकी ते ममुराबाद रेल्वे पुल (ममुराबाद रस्ता) | २५२९९००/- |
| १०. | प्र.क्र.४ पुष्पलता बेंडाळे चौक पांझरापोळ चौक रस्ता करणे. | १५१७९४०/- |
| ११. | प्र.क्र. ४ बॉम्बे हार्डवेअर ते सुर्या सॉ मिल (जोशीपेठ) | २०२३९२०/- |
| १२. | प्र.क्र.५ गोविंदा रिक्षा स्टॉप ते पिंप्राळा रेल्वेगेट पर्यंतचा रस्ता. | ५९९८८६०/- |
| १३. | प्र.क्र.१६ नानीबाई हॉस्पिटल ते हेमु कलानी टाकी पर्यंतचा रस्ता. | ४६१७०६८/- |
| १४. | प्र.क्र.१६ देविदास कॉलनी ते टी.एम.नगर. | ४७४३५६३/- |
| १५. | प्र.क्र.१६ पंचमुखी हनुमान मंदीर ते डॉ.चिंचोले. | ३२४६७०५/- |
| १६. | प्र.क्र.१७ एस.टी. वर्कशॉप ते का.उ.कोल्हे विदयालय पर्यंत. | ७५८९७००/- |
| १७. | प्र.क्र.१७ नेरी नाका ते कब्रस्तान पर्यंतचा रस्ता. | २२७६९१०/- |

| | | |
|---|---|---|
| १८. | प्र.क्र.६,७ कोर्ट चौक ते गणेश कॉलनी चौक. | १६२५९०५७/- |
| १९. | प्र.क्र.७ शासकीय औदयोगीक प्रशिक्षण संस्थेच्या पूर्वेकडील रस्ता. | ३२७९५५१/- |
| २०. | प्र.क्र.७ आशाबाबा मंदीर ते पिंप्राळा गट नं.८७ पर्यंत. | ४०८४७२२/- |
| २१. | प्र.क्र.७ वर्धमान हाईट ते पिंप्राळा गट नं.८०. | ४०८४७२२/- |
| २२. | प्र.क्र.७ पिंप्राळा रेल्वे गेट ते बजरंग बोगदा (नवसाचा गणपती मंदीर रस्ता) | ४८३७३२०/- |
| २३. | प्र.क्र.८,९ बजरंग बोगदा ते सुरत रेल्वे गेट परिसरातील रस्ते (एसएमआयटी रस्ता) | ६६९०३६७/- |
| २४. | प्र.क्र.९ कृष्णा टॉवर पासुन सुबोध क्लासेसकडे जाणारा रस्ता. | ३८६०३७०/- |
| २५. | प्र.क्र.९ बारी कॉम्प्लेक्स परमार्थ निकेतन आर.एल. कॉलनी ते आव्हाणे रोड | ७०६३२७३/- |
| २६. | प्र.क्र.८ खोटे नगर खदान, पोलिस स्टेशन समोरील रस्ता डांबरीकरणे. | ५६६५२२४/- |
| २७. | प्र.क्र.९ पिंप्राळा सोमानी मार्केट ते नॅशनल हायवे पर्यंतचा (बाजार रोड) रस्ता. | ५१४७८५१/- |
| २८. | प्र.क्र.८ गुड्डूराजा नगर ते स.नं.२९० पर्यंतचा रस्ता डांबरीकरण. | ८६७२०६०/- |
| २९. | प्र.क्र.८ निमखेडी रोड ते नॅशनल हायवे ६ गट नं.११८/५, ११८/६ मधून व्दारका नगर रस्ता. | ११९२४९१५/- |
| ३०. | प्र.क्र.८ दादू अर्पाटमेंट ४० खोल्या ते श्रीराम मंदीरा पर्यंतचा रस्ता. | ४८५००००/- |
| ३१. | प्र.क्र.८ सायली मेडीकल ते दादू अर्पाटमेंट पर्यंत रस्ता. | १५०००००/- |
| ३२. | प्र.क्र.८ गुजराल पेट्रोल पंप ते उर्तुंग कॉर्नर (जुना निमखेडी रोड) | २६०००००/- |
| ३३. | प्र.क्र.१५ मेहरुण गांव बुरुझ ते महादेव मंदीर ते शामा फायर पर्यंतचा रस्ता. | ११८८३०८१/- |
| ३४. | प्र.क्र.१८मेहरुण हॉटेल काशिनाथ ते अशोक किराणा चौका पर्यंतचा रस्ता. | ६७३२६०२/- |
| ३५. | प्र.क्र.१२ गिरणा टाकी ते सुरभी हॉटेल पर्यंतचा रस्ता. | ३२२५६२३/- |
| ३६. | प्र.क्र.१२ हॉल ते रामदास कॉलनी ओपनस्पेस पर्यंतचा रस्ता. | २३३२८९०/- |
| ३७. | प्र.क्र.१२ ओंकारेश्वर मंदीर ते साईबाबा मंदीर (सुयोग कॉलनी) पर्यंतचा रस्ता. | १६३२९१२/- |
| ३८. | प्र.क्र.११ रामानंद नगर घाट (रेशमी प्लाझा) ते कोल्हे नगर पर्यंतचा रस्ता. | ३६२४३१२/- |
| ३९. | प्र.क्र.१० सोमानी मार्केट ते पिंप्राळा दर्गा पर्यंतचा रस्ता. | ३७९४८५०/- |
| ४०. | प्र.क्र.१२ अल्पबचत निवासी क्वार्टर ते जी एस टी भवन ते हायवे सर्व्हीस रोड | २९७२६३३/- |
| ४१. | प्र.क्र.१२ पिंप्राळा मेहरुण शिवरोड ते समता नगर (अनुराग स्टेट बँक कॉलनी मधील १२ मी रुंद डी पी रोड) | ४९९९०५०/- |
| ४२. | प्र.क्र.१३ महाबळ चौक ते जिजाऊ चौक झाकीर हुसैन कॉलनी. | ९६१३६२०/- |
| ४३. | प्र.क्र.१३ मोहाडी रोड राकेश नगर ते देवेंद्र नगर ३० मी रोड वरील दर्गा पर्यंत. | ६०७१७६०/- |
| ४४. | प्र.क्र.१४ गणपती मंदीर ते हायवे पर्यंतचा गणपती नगर मधील मुख्य रस्ता. | ३०३५८८०/- |
| ४५. | प्र.क्र.१४ डी.मार्ट ते शिवाजी उदयान स्विमिंग टँक रोड | ३६७२५७२/- |
| ४६. | प्र.क्र.१४ शिवाजी उदयान स्मशान भुमी ते आदीत्य हॉटेल पर्यंत रोड | २३३९३१५/- |
| ४७. | प्र.क्र.१४ अशोक किराणा ते जकात सोसायटी पर्यंतचा रोड | ५८३२२६३/- |
| ४८. | प्र.क्र.१४ मेहरुण पाणी पुरवठा कार्यालय ते स्वामी समर्थ चौक ते तुळजा माता नगर | ४९३४९९२/- |
| ४९. | प्र.क्र.१२ रामदास कॉलनी ओपनस्पेस मध्ये बगीचा विकसित करणे. | २०५६६३२०/- |
| ५०. | प्र.क्र.१ मध्ये बौध्द विहार ते कानळदा रस्त्यापर्यंतचा रिंगरोड | ४१०००००/- |
| ५१. | प्र.क्र.१ केसी पार्क ते महाविर जिन पर्यंतचा रस्ता. | ४८५००००/- |
| ५२. | प्र.क्र.२ श्री.कंक यांच्या घरापासून ते क्रांतीचौक ते शिवाजी नगर हुडको कोपऱ्या | ४५७००००/- |

| | | |
|---|---|---|
| | रस्ता. | |
| ५३. | प्र.क्र.५ रेल्वे स्टेशन ते जिल्हा परिषद पर्यंतचा रस्ता. | ४०४७८४०/- |
| ५४. | प्र.क्र.६ सुपारी कारखाना ते रुख्मा टेंट हाऊस पर्यंतचा रस्ता. | ४०६४७६५/- |
| | एकुण रक्कम रुपये - | २९६७७७०५०/- |

तसेच विरोधी पक्षनेता, गटनेते, सन्मा.सदस्य श्री.विष्णू रामदास भंगाळे तसेच इतर सन्मा.सदस्यांच्या मागणीनूसार मा.महापौर यांनी सभेचेवेळी खालील १ ते ३४ कामे समाविष्ट करणेबाबत सभागृहात सूचित केलेले असून ती कामे खालील प्रमाणे,

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१ शिवाजी नगर धनाजी काळे नगर ते आव्हाणे रोडपर्यंतचा २४ मी रुंद रस्ता. | ८७००००० .०० |
| २. | प्र.क्र.६ बाबा हरदासराम मंगल कार्यालय ते आंबेडकर नगर पर्यंतचा रस्ता व बीएसएनएल क्वार्टर पर्यंत. | ८१२९०००.०० |
| ३. | प्र.क्र.७ रिंगरोड हनुमान मंदीर ते चंद्रप्रभात कॉलनी पर्यंत रस्ता. | ३६५८०००.०० |
| ४. | प्र.क्र.७ युनिटी चेंबर ते प्रभुदेसाई कॉलनी पर्यंत रस्ता. | ५४२००००.०० |
| ५. | प्र.क्र.११ कोल्हे नगर १०० फुट रोड ते गिरणा पंपींग रोड पर्यंत १०० फुटी रिंगरोड | २३१९५५००.०० |
| ६. | प्र.क्र.१८ व १९ औरंगाबाद रोड हॉटेल कस्तुरी ते मेहरुण बुरुजा पर्यंत रस्ता. | १०६२९१०८.०० |
| ७. | प्र.क्र.११ रामानंद नगर पोलीस स्टेशन ते विदयुत कॉलनीमार्गे हायवे पर्यंत. | ३७९४०००.०० |
| ८. | प्र.क्र.०६ मंजूषा हौ.सोसा.मधील श्री.डांबरे आप्पा यांचे घरापासून ज्ञानदेव मंदीरा पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | १३५००००.०० |
| ९. | प्र.क्र.०६ दत्त कॉलनी मधील डॉ.अशोक पाटील यांचे घरासमोर शिवशक्ती कार बाजार मागील गल्लीतील रस्ता डांबरी करण करणे. | ९२२०००.०० |
| १०. | प्र.क्र.१७ पांझरापोळ चौक ते राजाराम मंगल कार्यालय पर्यंत डांबरी रस्ता. | ३५००००० .०० |
| ११. | प्र.क्र.१७ आयोध्या नगर स.क्र.१४१ बगीचा ते जुनी जिन पर्यंत. | ३७००००० .०० |
| १२. | प्र.क्र.११ वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर पुलापर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ७७५२०००.०० |
| १३. | प्र.क्र.१० खंडेराव नगर ते हुडको पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ३१००८००.०० |
| १४. | प्र.क्र.११,१२ एकलव्य जिम (एम.जे.कॉलेज) ते शिव कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ७७५२०००.०० |
| १५. | प्र.क्र.११ दत्त डिगंबर हौ.सोसा. ते गिरणा पंपींग पर्यंतचा ३० मिटर रुंद रस्ता डांबरीकरण करणे. | ३५८५३००.०० |
| १६. | प्र.क्र.१७ काशिनाथ हॉटेल,गृहकुल कॉलनी ते पंढरपूर नगर पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे (म्हाडा कॉलनी ते पंढरपूर नगर) | १०२५००००.०० |
| १७. | प्र.क्र.०४ शनिपेठ पोलिस चौकी ते ओक मंगल कार्यालया पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | १९०००००.०० |
| १८. | प्र.क्र.४ भिलपूरा पोलिस चौकी ते ममुराबाद रेल्वे पूला पर्यंतच्या रस्त्याला जोडणारे पुर्व पश्चिम ५ रस्ते डांबरी करण करणे. (डावी बाजूकडील) | २५००००० .०० |
| १९. | प्र.क्र.२ कालंका माता मंदीर ते रेल्वे लाईन व अनिल प्रोव्हीजन ते सोपान कोळी यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | २५००००० .०० |
| २०. | प्र.क्र.३ सुनंदीनी पार्क ते काशिनाथ नगर पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ४७७४२५४.०० |

| | | |
|---|---|---|
| २१. | नवि पेठ एलआयसी ऑफीस ते रथ चौक रस्ता | ७६०००००.०० |
| २२. | प्र.क्र.१८ सारा हॉस्पीटल (घुगे पाटील केरोसिन) चौक ते संतोषी माता गणेशपूरी ते हायवे रस्ता. | १०५००००० .०० |
| २३. | प्र.क्र.७ हरीश स्वीट मार्ट ते आय.एम.आर.पर्यंतचा रस्ता | ३६६५०००.०० |
| २४. | प्र.क्र.७ पिंप्राळा ग.क्र.८७ आर.एम.एस.कॉलनी मागील भागाचा रस्ता तयार करणे. | १६८००००.०० |
| २५. | प्र.क्र.१३ मोहाडी रोड डॉक्टर सुतार यांचे घर ते संभाजी नगर चौक रस्ता. | ४२५००००.०० |
| २६. | प्र.क्र.१५ तांबापुर महादेव मंदीर ते शिरसोली नाका रस्ता. | ४१४३०००.०० |
| २७. | प्र.क्र.०५ मधील बॉम्बे मेडीकल ते टेलिफोन ऑफिस पर्यंतचा रस्ता. | ३६०००००.०० |
| २८. | प्र.क्र.०५ मधील स्टेट बँक ते भिकमचंद जैन मार्केट पर्यंतचा रस्ता. | २५०००००.०० |
| २९. | प्र.क्र.०२ मधील हरीओम नगर हनुमान मंदीर ते साईबाबा मंदीरापर्यंतचा रस्ता. | १८०००००.०० |
| ३०. | प्र.क्र.०२ मधील हरीओम नगर मधील वॉशिंग सेंटर जवळील ४ रस्ते. | ५००००००.०० |
| ३१. | प्र.क्र.०२ मधील मुरलीधर गयबु सपकाळे ते दत्तु वायरमन यांचे घरापर्यंतचा रस्ता. | १२०००००.०० |
| ३२. | प्र.क्र.०३ मधील असोदा रोड ते तानाजी मालुसरे नगर मधील गोपाळ सोनवणे यांचे घरापर्यंतचा रस्ता. | २९६२०५०.०० |
| ३३. | प्र.क्र.०३ मध्ये असोदा रोड पासुन दिनकर नगर मोहन टॉकीजच्या मागे कैलास कोळी यांचे घरापर्यंतचा रस्ता. | २०५००००.०० |
| ३४. | प्र.क्र.१७ मध्ये हॉटेल संजय ते लिलापार्क पर्यंतचा रस्ता. | १९५४८००.०० |
| | एकुण रक्कम रुपये - | १७००१६८१२/- |

सभागृहातील चर्चेनूसार उपरोक्त नमूद अ.क्र.१ ते ५४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२९६७७७०५०/- मात्रचे खर्चास तसेच अ.क्र. १ ते ३४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१७००१६८१२/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने सदर रस्त्यांवर अमृत पाणी पुरवठा व अंडरग्राऊंड ड्रेनेजची कामे पुर्ण झालेनंतरच सदर कामांचे कार्यादेश देण्याबाबतची पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०** **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- २)** शहरातील प्रमुख डांबरी रस्ते दुरुस्ती करणेकामी सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व इतर १ सदस्यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर व रक्कम रु.२३७१८०४०/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्तावामध्ये रक्कम रु.२,३७,१८,०४०/- ऐवजी ५ कोटी मात्रची तरतुद करुन जी कामे या रस्त्यावर करीत आहे त्यात महापौरांनी सुचविलेली कामे सुध्दा करण्यात यावी त्यांचा देखील समावेश करण्यात यावा. २ कोटी ३७ लक्षच्या ऐवजी ५ कोटीची तरतुद करण्यात यावी.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब. मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** सुनिल भाऊ बोला.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब, विरोधी पक्षाच्या वार्डातील एक ही काम घेतलेले नाही. याच्या मध्ये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** रु. २ कोटी च्या ऐवजी ५ कोटी म्हणुनच करण्यात यावी. आपण तुम्ही द्याल ना प्रस्ताव.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** सुनिल भाऊ आवाज येत नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब, प्रभाग क्र.१५ मधील एक ही काम घेण्यात आलेले नाही रस्ता दुरुस्ती करण्याचा. प्रभाग क्र.१५, १८, १९ म्हणजे एम.आय.एम आणि शिवसेना

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनिलभाऊ ऐका १ ते १९ प्रभागचे ५०- ५० लाख आहेत ऐकुन घ्या आणि हे जे ४ कोटीचे रस्ते आहेत ना ते सगळे प्रमुख रस्ते आहेत ते वार्ड निहाय नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** ठिक आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अप्पा साहेब, चौफुली ते दुध फेडरेशनचा जो रस्ता आहे ते नविन रस्त्यात घेतलेले आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** याच्यामध्ये शहराचे काही प्रमुख रस्ते आहे काही दुरूस्ती मध्ये आहेत. आपण तुम्ही सगळे गटनेते या ज्यांची शंका आहे आपण बसु ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** रियाजभाई , सुनिलभाऊ सर्वानुमते मंजुर आहे का

**श्री.सुनिल महाजन :-** हो सर्वानुमते मंजुर आहे.

**नगरसचिव :-** रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** हा सर्वानुमते मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील रस्ते फारच खराब झालेले असून गेल्या काही वर्षापासून शहरात नवीन रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेली नाही तसेच शहरात अमृत पाणी पुरवठा योजना, पाणी पुरवठा कामे व अंडरग्राऊंड ड्रेनेज कामी झालेल्या मोठया प्रमाणातील खोदकाम व नुकताच चालु पावसाळयातील पावसाच्या पाण्यामुळे देखिल रस्त्यांची बिकट परिस्थिती निर्माण झालेली असल्याने खालील नमूद १ ते ४ प्रमुख रस्ते दुरुस्ती करणेचे कामास तसेच सन्मा.सदस्यांचे मागणीनूसार मा.महापौर यांनी सभेचेवेळी सूचित केल्याप्रमाणे अ.क्र.५ चे काम समाविष्ट करुन सदर काम करणेस व एकूण येणाऱ्या रक्कम रु.२२६१२९८०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | सिंधी कॉलनी चौक ते पिंप्राळा रेल्वे गेट पर्यंतचा रस्ता. | १२०५१०२/- |
| २. | दधिची चौक ते महाबळ पर्यतचा मुख्य रस्ता. | २४३९४९३/- |
| ३. | वाघ नगर ते काव्य रत्नावली ते डिमार्ट पर्यंतचा मुख्य रस्ता. | १९६८३८५/- |
| ४. | बॉम्बे लॉज चौक ते अजिंठा चौफुली व एस.टी.वर्कशॉप ते का.ऊ.कोल्हे विदयालयापर्यंतचा मुख्य रस्ता, नेरीनाका ते स्वातंत्र्य चौकपर्यंत. | ९००००००/- |
| ५. | घाणेकर चौक, पुष्पलता बेंडाळे चौक ते शिरसोली रोड मनपा हद्दीपर्यंत. | ८००००००/- |
| | एकुण रक्कम रुपये - | २२६१२९८०/- |

सदरील प्रस्तावा मधील रक्कम रुपये २२६१२९८०/- या ऐवजी रुपये ०५ कोटी मात्रची तरतूद करुन जी कामे यादी प्रस्तावाअंतर्गत आहेत त्यासह मा.महापौर जे इतर रस्त्यांची कामे सूचवतील त्यांचा देखिल या निधीत समावेश करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०      प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- ३)** दलित वस्ती सुधारणा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.३ मध्ये रस्ते तयार करणेकामी सन्मा. सदस्या सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया मला या विषयावर बोलायचे आहे.

**नगरसचिव :-** कुलभुषणभाऊ आवाज येत नाहीये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणेसाहेब माझा आवाज येत नाहीये का ? एक सुचना अशी लक्षात आली का ? गोराणेसाहेब

**नगरसचिव :-** कुलभुषणभाऊ बोला .

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणेसाहेब मी मांडलेली सुचना अशी लक्षात आली का ? हॅलो

**नगरसचिव :-** हॅलो हो बोला भाऊ .

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणेसाहेब मी मांडलेली सुचना अशी लक्षात आली का ? हॅलो

**नगरसचिव :-** हॅलो हो बोला भाऊ .

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता हा जो विषय आलेला आहे. दलित वस्ती सुधारणा निधी अंतर्गत प्रभाग क्र.३ मध्ये रस्ते तयार करणे कामी सन्मा.सदस्या सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर विचार करु न निर्णय घेणे. याच्यामध्ये सारखाच विषय अ.क्र.७ चा आलेला होता. तर नंबर ७ चा विषय आणि ज्यादा विषयामधील नंबर ३ चा विषय हे दोन्ही विषय सारखे असुन आलेला जो निधी आहे त्याचा प्रथम प्राधान्य विषय क्र.७ ला देण्यात यावे.उर्वरित जे निधी आहे. तो या कामासाठी वापरण्यात यावा. हॅलो गोराणे साहेब ऐकु येत आहे का ? ऐकु येत आहे का ?

**श्री.सुरेश सोनवणे :-** हो ऐकु येत आहे.

**श्री.रियाज बागवान:-** हॅलो.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिलभाऊ, रियाजभाई सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणे साहेब, मी मांडलेली सुचना लक्षात आली का ?

**नगरसचिव :-** हो बोला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** गोराणे साहेब, मी मांडलेली सुचना लक्षात आली का ?

**नगरसचिव :-** नाही बोला ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये सारखाच विषय अ.क्र.७ चा आलेला होता. तर नंबर ७ चा विषय आणि ज्यादा विषयामधील नंबर ३ चा विषय हे दोन्ही विषय सारखे असुन आलेला जो निधी आहे त्याला प्रथम प्राधान्य विषय क्र.७ ला देण्यात यावे.उर्वरित जो निधी आहे. तो या कामासाठी वापरण्यात यावा.

**नगरसचिव :-** ओके ओके, म्हणजे सुचक म्हणुन भुमिका आहे तुमची.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो मी सुचक आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक, अनुमोदक,

**सौ.रंजना सपकाळे :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिलभाऊ, आदरणीय सुनिलभाऊ, विष्णु भाऊ.

**श्री.रियाज बागवान :-** हा सर्वानुमते आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, सर्वानुमते करा.

**नगरसचिव :-** हो हो ठिक आहे.

**मा.महापौर :-** हो ठिक आहे. खडके साहेब बोलत आहे दोन मिनीट.

**श्री.डि .एस खडके :-** आदरणीय महापौर, मी .डि .एस खडके, शहर अभियंता मी आज रोजी जळगांव महापालिकेत ३५ वर्ष सेवा पुर्ण करून दि. ३०/०९/२०२० रोजी सेवानिवृत्त होत आहे. माझ्या ३५ वर्ष सेवा काळात मी पाणी पुरवठा विभागात व २३ व १२ वर्ष बांधकाम विभागात सेवा बजावलेली आहे.माझ्या या सेवा काळात महानगरपालिकेचे निवडुन आलेले सर्व सन्मा.नगरसेवक , कत्रांटदार असेल , महापौर तसेच सर्व सन्मा.पदाधिकारी तसेच मा.आयुक्त , गटनेते , सभागृह नेते , स्थायी समिती सभापती , उपमहापौर , विरोधी पक्ष नेते व इतर सर्व अधिकारी / पदाधिकारी व कर्मचारी यांचे मला सहकार्य लाभले या सर्व अधिकारी व पदाधिकारी यांचे मी मनापासुन आभार व्यक्त करतो व माझ्या सेवा काळात जळगांवातील नागरीकांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सेवा देण्याचे प्रयत्न केलेले आहे या काळात मागील काही पदाधिकारी , अधिकारी व कर्मचारी यांचे मन दुखावले असल्यास त्याबद्दल मी दिलगीरी व्यक्त करीत आहे.मला जळगांवातील नागरीकांच्या प्रेमापोटी मी जनतेचे देखील आभार व्यक्त करतो . तसेच सर्व वृत्तपत्राचे छायाचित्रकार व पत्रकार बांधव यांनी केलेल्या सहकार्याचे मी आभार व्यक्त करतो व तसेच मी पुन्हा एकदा सभेचे आभार व्यक्त करतो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील प्रभाग क्रमांक ३ जुना खेडी रोड, जुना असोदा रोड, खेडी गांव तलाठी कार्यालय ते महामार्ग क्र.६ पर्यंतचा रस्ता, कालंका माता मंदीर ते हेरंब सुपर शॉपी पर्यंतचा रस्ता हे रस्ते प्रभागातील प्रमुख रस्ते असून यावरुन खेडी गावठण व जुने जळगांव परिसरासह इतर नागरीकांची सदैव वर्दळ वाहतुक असते. मात्र सदर रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झालेली असल्यामुळे नागरीकांना वाहतूकीस व रहदारीस अडचणीचे व त्रासदायक होत आहे तसेच प्रसंगी लहान सहान अपघात देखिल होत आहेत. त्यामुळे सदर रस्ते नव्याने तयार करणे बाबत नागरीकांकडून वारंवार मागणी होत आहे.

सदर प्रभाग हा अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव असून दलित वस्ती सुधारणा निधी अंतर्गत अनुज्ञेय असल्यामुळे खालील नमूद १ ते ४ कामे सन २०२०-२१ दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त निधी किंवा पुर्ननियोजन मधील निधी अंतर्गत करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर रस्त्यावर अमृत पाणी पुरवठा व अंडरग्राऊंड ड्रेनेजची कामे पुर्ण करणेबाबत कार्यवाही करुन सदर कामे पुर्ण झालेनंतरच कार्यादेश देण्याची कार्यवाही करावी.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.३ गोपाळपूरा ते हरी ओम नगर जुना असोदा रस्ता करणे. | ८९९८२९०.००/- |
| २. | प्र.क्र.३ गोपाळपूरा ते खेडी मधील खडके शाळेपर्यंत जुना खेडी रस्ता करणे. | ११३८४५५०.००/- |
| ३. | प्र.क्र.३ खेडी ते नॅशनल हायवे ते तलाठी कार्यालय रस्ता करणे. | २२७६९१०.००/- |
| ४. | प्र.क्र.३ कालिका माता मंदीर ते जुना खेडी रोड (रिंगरोड)करणे. | ३७९४८५०.००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- सपकाळे रंजना भरत**

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**(भारती कैलास सोनवणे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**